
# माणूस

शनिवार

१७ जून १९७२

पन्नास पैसे



शतपावली
ह्या इथली
तळकोकणातली

माणूस
शनिवार
१७ जून १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : तीन

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.
दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## सप्रेम नमस्कार....

४ जून १९७२

□ ३ जून १९७२ चा अंक वाचला. फार आवडला. विशेषेकरून या अंकातील सौ. सुमती भिडे यांची 'अलिप्त' ही कथा फार आवडली.

या कथेत लेखिकेने मोजक्या पात्रांतून व मोजक्याच शब्दांतून सुंदर कथानक चितारले आहे. कथानकाचे स्वरूप सरळ—साधे व कोणत्याही मध्यम परिस्थितीच्या कुटुंबात घडेल असेच आहे. पंतांच्या लोकविलक्षण शिस्तीमुळे घडत गेलेल्या घटना रंगविताना लेखिकेने नेहमीच्या वापरातीलच शब्दसंपदा उपयोगात आणलेली आहे. कोठेही पल्लेदार वाक्यांचा डामडौल नाही वा विनाकारण केलेला शब्द-पाल्हाळपणा नाही.....

या कथेत '' अरे काय घर आहे का हॉटेल? सारखे चहापाणी, रेडिओ, सिनेमे' यासारख्या वाक्यातून दिसणारा पंतांचा स्वभाव .. नंतर 'आजोबा' या एका शब्दाची पंतांच्या मनावर झालेली प्रतिक्रिया .. व कथेच्या शेवटी 'बाबा तुम्ही ?' या दोनच शब्दांतून स्पष्ट झालेला पतांच्या स्वभावातील विलक्षण बदल .. सारेच कसे लेखिकेने सुगम व ओघवत्या भाषेत रेखाटलेले आहे.

या कथेत कल्पनेची झेप नाही, की शब्दसौंदर्याचे प्रदर्शन नाही; तर कुठल्याही सामान्य कुटुंबातील सर्वसामान्य व्यक्तीचे स्वभावचित्रण आहे...त्यांचे यथातथ्य दर्शन आहे!

यासारख्याच कथा 'माणूस' वाचकांकरिता यापुढे सातत्याने सादर करील हीच माणूसबद्दल अपेक्षा!!!

प्रकाश ताडले, जालना

एक ओझरती मुलाखत

# पदवीधर मतदार संघ निवडणूक

**शरद् कृष्णन्**

विधान सभेच्या पदवीधर मतदार संघातील (दिनांक अठरा जून) निवडणुका चांगल्या रंगणार आहेत. विद्यमान आमदार उत्तमराव पाटील व प्रा. प्रधान यांच्याखेरीज चेरीयन व सौ. मालतीबाई परांजपे निवडणुकीस उभ्या आहेत. उत्तमराव पाटील व सौ. मालतीबाई परांजपे यांच्यामागे मजबूत पक्ष यंत्रणा आहे. जनसंघासंबंधी सहानुभूती असलेला खूप मोठा वर्ग या मतदारसंघामध्ये आहे. प्रा. प्रधान यांच्यामागे यंत्रणा मोठी नसली, तरी प्रधान यांची विधान परिषदेतील कामगिरी निर्विवादपणे चांगली आहे. त्यांच्याविषयी वैयक्तिक प्रेमभाव बाळगणारेही पुष्कळ आहेत. चेरीयन यांच्या उमेदवारीस काँग्रेसचा पाठिंबा आहे. परंतु केवळ बाईंच्या नावाची निर्बुद्ध जादू आणि 'गरिबी हटाव'चा मंत्रजागर या मतदारसंघात चालणार नाही. चर्चमार्फत चाललेला प्रचार आणि थोडेफार दाक्षिणात्य पदवीधर या आधारावर त्यांचे काम चालू आहे.

जनसंघाने दोन्ही जागा लढवण्याचा निर्णय घेतल्याने, आणि प्रधान यांच्या दखल घेण्यासारख्या उमेदवारीची पाचर असल्याने, सर्वसाधारणपणे दुर्लक्षिल्या जाणाऱ्या या निवडणुकीवर लक्ष जरूर केंद्रित झाले आहे.

एक जागा जनसंघाला मिळणारच, हे सांगायला ज्योतिषाची आवश्यकता नाही. परंतु दुसऱ्या जागेसाठी जनसंघ प्रयत्नशील राहिल्याने, निवडणुक रंगत असल्याने, मी सरळ सौ. मालतीबाई परांजपे यांना जाऊन भेटलो.

निवडणूक-प्रचाराच्या धामधुमीत बाई होत्या. पदवीधर जिथे सापडण्याची [illegible] ॉले जे, कचेऱ्यांच्या भेटीचा कार्यक्रम पार पडला होता. या मतदार संघामध्ये पुणे शहरास विलक्षण महत्त्व, कारण एकतीस हजार मतदारांपैकी जवळ जवळ १५ हजार एकट्या पुण्यात.

दोन्ही उमेदवार जनसंघाचे मग तुम्ही अग्रक्रम मागता तो कोणत्या तत्त्वावर?

जागा दोन असल्या तरी उमेदवारांची निवड ही 'प्रेफरन्स' पद्धतीने होणार

असल्याने अग्रक्रम ठरवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आम्ही एकूण मतदार संघाची विभागणी केली आहे. पुण्यात मी प्रथम क्रमांकाचे मत मागीतले असून द्वितीय क्रमांकाचे मत उत्तमरावांना द्यावे अशी विनंती केली आहे. अशीच विनंती उत्तमरावांनी त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या संपूर्ण मराठवाडा, जळगाव, धुळे, नाशिक, ठाणे, कुलाबा, आदी विभागामध्ये केली आहे. यामध्ये कोणतेही मतभेद नाहीत. दोन्ही उमेदवार निवडून यावेत या दृष्टीने ही सोय केली आहे. काही स्थानिक दैनिकांनी त्यावरून उगाचच वावटळ उठवले. दोघांची पत्रके स्वतंत्र असून, त्यामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे मतासाठी विनंती असली तरी सही एकाची आहे. प्रधान यांनी जरी त्यांच्या पक्षाचा दुसरा उमेदवार उभा केला असता तरी त्यांनाही अशी विभागणी करावी लागली असती. कारण होणारे मतदान हे केवळ दोन फुल्याने होणार नसून गुंतागुंतीच्या अग्रक्रम पद्धतीने होणार आहे.

निवडणूक-प्रचाराचे दृष्टीने आपले काय अनुभव आहेत ?

या निवडणुकीचे तंत्र वेगळे असते. प्रचारसभा, मिरवणुकी, फलक हे सार्वत्रिक निवडणुकीचे तंत्र कुचकामी असते. शिवाय पदवीधर मतदार केवळ प्रचाराने एखाद्या बाजूला ओढला जाईल असे समजणे चुकीचे मानावे लागेल. असे असले तरी प्रचारखर्च भरपूर होतो. प्रत्येक मतदाराला भेटणे शक्य नसल्याने पत्रव्यवहार हाच मार्ग. आता एकतीस हजार मतदारांना पत्रे टाकायची–निदान दोन–तरी केवढा खर्च. परंतु तो करावाच लागतो. याद्या निर्दोष असाव्यात अशी अपेक्षा असते. ती पण पूर्ण होत नाही. त्यामुळे संपर्क साधण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न करावा लागतो.

सार्वत्रिक निवडणुकीतील मतदानापेक्षा येथील मतदान वेगळ्या पद्धतीने होते का ?

मी वर सांगितलेच आहे, की प्रचारामुळे मते फुटण्याचा येथे फारसा संभव नसतो. तथापि सर्वसाधारणपणे सुशिक्षित वर्गाचा कल कोणत्या बाजूस आहे, कोणत्या विचारसरणीचा ते पुरस्कार करतात याचे प्रतिबिंब या निवडणुकीमध्ये जरूर पहावयास मिळते.

आता आणखी एक प्रश्न–राज्यातील विधान परिषदांची खरोखर आवश्यकता आहे काय ?

माझे स्वतःचे आत्तापर्यंत असे मत होते, की विधान परिषदेच्या रूपाने अकारण खर्चाचा बोजा वाढतो. म्हणून त्या रद्द कराव्यात. परंतु १९७२ च्या विधानसभा-निवडणुकीमध्ये सत्ताधारी पक्षाला जो प्रचंड विजय मिळाला, त्यामुळे कनिष्ठ सभागृहामध्ये त्यांची अति प्रचंड शक्ती निर्माण झाली. मनात आणले तर दोन

दिवसांत विधेयक संमत करून घेण्याची ताकद निर्माण झाली. या ताकदीला आवर घालण्याचे कार्य, तिचा गैरवापर होणार नाही याची काळजी घेण्याची गरज आणि एखादे विधेयक त्वरेने संमत झाले, तर त्याविरुद्ध जनमत संघटित करण्यास अवधी मिळण्याची आवश्यकता–या दृष्टीने सध्या म्हणजे निदान आणखी ५–२५ वर्षे विधान परिषद आवश्यक आहे असे मला वाटते.

या मतदार संघातील जागांच्या विषम वाटणीबद्दलही सौ. मालतीबाईंनी नापसंती व्यक्त केली. विदर्भाच्या ८ जिल्ह्यांना तीन जागा, मुंबईसाठी २ जागा आणि हे विभाग सोडून महाराष्ट्र–मराठवाड्याच्या उरलेल्या सर्व म्हणजे १७ जिल्ह्यांना केवळ दोन जागा, हे जागा-वाटपाचे गणित चमत्कारिक असून त्यामध्ये योग्य ते बदल त्वरित घडवून आणून जागा वाढवून दिल्या पाहिजेत, असा त्यांचा आग्रह दिसला.

जनसंघ फाटाफुटीबद्दल विचारलेला प्रश्न त्यांना तितकासा रुचला नसावा–बाईंनी प्रतिक्रिया नोंदवली ती इतकीच, की चर्चेतील मतभेदाला अवास्तव महत्त्व हेतुतः दिल्याने फुटीचे वातावरण पसरवले जाते. पक्षफुटीच्या समजुती चुकीच्या असून चर्चेमध्ये मतभेद झाले, तरी एकदा निर्णय घेतला, की त्याची अंमलबजावणी अजून तरी होते.

पक्षाची वाढती ताकद, सुशिक्षित वर्गामध्ये पक्षाबद्दल असलेली सहानुभूती यांचा विचार करून दोन्ही जागा लढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. निवडणुकीतील यशाबद्दल सौ. मालतीबाई आशावादी असल्या तरी त्यांना फाजील आत्मविश्वास नसल्याचे जरूर जाणवले.

उत्तमराव–मालतीबाई, प्रधान–चेरीयन–चारातील कोणतेही दोन निवडले गेले तरी त्यात जनसंघाचे तसे नुकसान नाही. एक जागा निश्चित मिळणारच आहे. दुसरी मिळाली तर वहाव्वा ! न मिळाली तर एक प्रयत्न फसला, म्हणून मंडळी पुन्हा कामाला लागायला मोकळीच राहणार !

## शतपावली

# ह्या इथे तळकोकणात

**रवींद्र पिंगे**

तहान लागलेला माणूस परत परत पाण्याच्या माठाकडे वळणार, तसाच कोकणी रक्ताचा माणूस फिरून फिरून कोकणातल्या आपल्या आगराकडे, परसंवाकडे वळणार. चैत्र–वैशाख ह्या त्यांच्या आषाढी–कार्तिकी एकादश्या आणि कोकण ही पंढरी. त्या पवित्र वारकऱ्यांमधला मी एक टाळकरी, रजा ओरबाडून दक्षिण कोकणात निघालो आहे. जागेवर बस शिल्लक नसणे, दुसऱ्या विभागाची मिनतवारीनं मिळालेली बस पाच तास उशीरा सुटणे, सलामीलाच किरकोळ अपघात होणं, पोलिसांनी थंड पंचनामा करणं, ड्रायव्हरने रस्ता चुकणं, रस्त्यात झाडं कोसळल्यामुळे पन्नास पाऊणशे मैलांचा फेरा पडणं, वगैरे सगळे अटळ सोपस्कार संपून मी राजापूरच्या तिठ्यापर्यंत तरी आलो आहे. इथून, म्हणजे राजापुरापासून कोकणी सृष्टीचं भिंग बदलेलं स्पष्ट दिसत आहे. डोंगरमाळ हिरवी जर्द दिसत आहे. झाडं अधिक उंच वाढली आहेत. जिथे तिथे जांभ्या दगडाचे गड्डे आणि जांभ्या चिऱ्यांचे जबडे असलेल्या बावी आहेत. माती लालेलाल आहे. भूमी कमालीची उंच सखल आहे. लठ्ठ लठ्ठ फणसाचे घड झाडांना बिलगले आहेत. माणसं दांडीवरल्या झिजलेल्या विरविरीत पंचासारखी मामुली, खरखरीत आणि आरपारदर्शक वाटतात. गरीबीसारखं दुसरं अतोनात पारदर्शक काय आहे ?

कोकण नेमकं कुठपासून सुरू होतं नि कुठे संपते ? श्रीवर्धनापासून कारवारपर्यंतचा हिरवा आणि ओला पट्टा, ते कोकण असा सर्वसाधारण समज आहे. मतलब न सुटलेले राजकारणी म्हणतात, गुजरातेतल्या भडोच बंदरापासून दक्षिणेच्या भटकळ बंदरापर्यंतचा चिंचोळा पट्टा ते कोकण. भूगोलाचं क्रमिक पुस्तक सांगतं की डहाणू–उंबरगाव ते कारवार–कुमठा हा सगळा कोकणीच पट्टा आहे. ह्यात खुद्द मुंबईसुद्धा आली. म्हणजे हा सगळा–सह्याद्री पर्वतासारखाच गुंता आहे, सह्याद्री नेमका कुठे सुरू होतो ? नि कुठे संपतो ? भूगर्भशास्त्रज्ञ सांगतात की तो धुळे जिल्ह्यातल्या सातपुड्याच्या रांगेजवळ उगम पावतो नि मंगळूरच्या परिसरात

मावळतो. पण आपल्या लेखी काय प्रकार आहे ? पुणे-मुंबई मार्गावर लागणारा घट्ट घाटमाथा आणि पुढे महाबळेश्वरापर्यंत दिसणाऱ्या अजस्त्र डोंगरलाटा इतकाच सह्याद्रीचा पसारा आहे. कोकणचंही असंच झालेलं आहे. रत्नागिरी बंदराच्या आसपास नारळी–पोफळीचा, आंब्या–फणसाचा, अननस–पपनसाचा परिसर म्हणजे कोकण हे आता गृहीत धरलं जातं. वास्तविक पहाता डहाणू हे कोकणच. पण चिकू पाहिल्यावर मन कोकणाकडे वळत नाही. एक तर ते शहरी फळ वाटतं. महाबळेश्वरही कोकणातच आहे. पण चेरीची फळं पाहिल्यावर कोकणातला कातळ आठवत नाही, की पाटाचा रेशमी पान्हा स्मरत नाही. पण तेच काजूच्या बोंडाकडे, नाहीतर पिक्क्या रातांब्याकडे पहा. दृष्टी बदलते. क्षणात तुमचं मन रत्नागिरीच्या, मालवणच्या सड्यावरून, पाय मोकळं करून येतं. केशवसुत सांगून गेलेच आहेत, ' विश्वाचा आकार केव्हढा ? ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा ?

राजापूर गाव सिमल्यासारखं डोंगर उतारावर वसलेलं आहे. एकाच्या अंगणात बसलं तर दुसऱ्याच्या कौलारातून निसटून येणारा कापरा धूर समोर दिसतो. घरं एकजात उंचसखलात जांभ्या चिऱ्यांची आहेत. निर्धन गावकऱ्यांच्या नजरेत ठाण मांडून बसलेला हताश शून्यभाव सोडला तर राजापुरात समानपातळीवर असलेलं काहीच नाही. सांगली–कोल्हापूराच्या परिसरावरून लक्ष्मीचा हात फिरलेला असतो. लक्ष्मीचा मायरव इथल्या पिढ्यान् पिढ्यांनी ऐकलेला नाही. राजापूर ही शिवकालीन बाजारपेठ आहे. इंग्रजांची किल्ल्यासारखी भक्कम वखार आपलं अंधारलेलं काळीज घेऊन गावात अजून उभी आहे. कंपनीच्या काळात साहेबाचे वाणिज्य दूत इथे गावात वसतीला असत. राजापूरच्या खाडीत साहेबाच्या गलबतांचा संचार असे. त्यातलं काहीही वैभव उरलेलं नाही. एक चिंचोळा आणि आखूड अंधारी बोळ आहे. तीच एकमेव बाजारपेठ. पावसाळ्यात म्हणे तिथे जगबुडी होते ! रस्त्याशी एक नागमोडी घसरगुंडं वळण हा राजमार्ग, सबंध गावाच्या डोक्यावर एक कबरस्तान आहे. तिथेच अंग चोरून एक अगदी खुजा, सफेत डाकबंगला आहे. बाकी गावात वसती करणं भागच पडलं तर डोकं टेकायला एकही जागा नाही. एस. टी. ने एक पत्रा ठोकला आहे. त्याच्याखाली अक्षरशः शेकडो मंडळी आपली न फळणारी भाग्ये घेऊन अवघडलेल्या अवस्थेत रात्रंदिवस तिष्ठत असतात.

त्यांच्यातलाच एक होऊन मी भर दुपारच्या उन्हात उभा आहे. आजूबाजूचे अवघडलेले सगळे पुरते हैराण झालेले दिसताहेत. लख्ख दाढी केलेला एकही पुरुष नाही. शांत दृष्टीचे देणे देवाने एकाही बाईला दिलेलं नाही. दोन–तीनशे माणसांची गर्दी असेल. त्यात दहा पंधरा कोकणी मुसलमान आहेत. त्यांच्या चेहेरेपट्टीवरून मी त्यांना नेमकं टिपलं आहे. कोकणी मुसलमानांची चेहेरेपट्टी अगदी ठराविक असते. उभट चेहेरे, रुंद नाकं, बिनघोर, मिजाशी नजर. ह्या घोळक्यात त्यातल्या

त्यात टवटवीत आणि श्रीमंतीचं पाणी मारलेल्या चेहेऱ्याची एक बाई आहे. तिच्या नजरेनेच सांगितलं, की ती कोकणी मुसलमान आहे. पत्रावळींच्या पंगतीत मध्येच एक चांदीचे ताट ठेवलेले असावं, तशी ती स्टँडवरल्या गरीबगुरीब कुणबी बायकांमध्ये विशोभित दिसते. अडीच वाजता म्हणजे आणखी पाच-दहा मिनिटांनी एस. टी. सुटणार असे वेळापत्रकावरून दिसतेय. एक कुणबी नवरदेव मला विचारतो आहे, 'साहेब, आम्हांला अडीचच्या गाडीची चाळीस तिकीटं रिझर्व करता येतील काय ?' त्याच्या इनोसन्सचा मला हेवा वाटला. दहा मिनिटांनी एक एस. टी. जोसात येऊन थांबली. नवरदेव आणि त्याच्या वऱ्हाडाला दूर ढकलून सगळेजण गाडीत घुसले. नवरदेव नाराज झाला नाही. त्या चाळीस मंडळींनी चक्क घाटी पकडली. आता चंद्रोदय होईपावेतो हे वऱ्हाड मुक्कामाला पोहोचेल आणि भाकऱ्यांचा फडशा उडवेल.

एस. टी. बदलून मी पुढच्या पल्ल्याला निघालो. राजापूर मागे टाकल्याचं अंमळ बरं वाटले. ह्या हताश गावाला गेला बाजार तीनशे वर्षांचा इतिहास आहे. पण इथे एक नवीन दुकान नाही की पथिकाश्रमाची मामुली सोयही झालेली नाही. भट्टी जेवणाची सोय फक्त एका जुनाट दुकानात आहे. हजारो खानावळींचं अन्न पचवलेला माणूस म्हणून, मी अधिकाराने सांगतो की राजापूरात मिळणाऱ्या ब्राह्मणी राईस प्लेट इतकं बेचव, भिकार, निस्सत्त्व आणि दरिद्रि अन्न दुनियेत कुठेही मिळत नसेल.

खाडी ओलांडताना मुसलमान होडीवाल्याशी गप्पा मारून घेतल्या.

'तुझे घर कुठे आहे ?'

'खाली खाडीच्या काठावर.'

'तुम्ही होडीवाले नमाज पडता ?'

'आमच्या धर्माप्रमाणे आम्ही दिवसातून पाच वेळा नमाजी पडली पाहिजे.'

'प्रत्यक्ष तू किती वेळा पडतोस ?'

'मी बापडा फक्त शुक्रवारी एकदा पडतो.'

'जसं तुझं तसंच इतरांचंही असेल.'

'नाही. हल्ली तरुणवर्ग जास्ती जास्ती धार्मिक होऊ लागला आहे. आमचे मुसलमान पोरगे खूप नमाजी पडतात.'

'कोकणात मशिदी किती आहेत ?'

'जिथे मुसलमान आहेत तिथे हरएक गावात मशीद आहेच.'

'शुक्रवारी किती नमाजी जमतात ?'

'पन्नास.'

'इदेला किती जमतात ?'

'दीडशे–दोनशे.'

" बायका पुरुष एकत्र नमाज पडता ?'

'नाही. कोकणातल्या मशिदीत फक्त पुरुष तेवढे जातात. बायकांची नमाजी सोय वेगळी केलेली असते.'

'बायकांसाठी वेगळी मशीद बांधतात ?'

'नाही. एखाद्या घरात सगळ्या बायका जमतात. कधी कधी घराच्या माळ्यावर जमतात नि तिथे नमाजी पडतात.'

'तुमचा पत्रव्यवहार कुठल्या भाषेत असतो ?'

'मराठी आणि उर्दू.'

'ह्या कोकणात फक्त मराठी भाषा होती, कोकणी मुसलमानही मोडीचे कित्ते गिरवीत. ही उर्दू भाषा इथे केव्हापासून आली ? तिचा व्यवहारात उपयोग काय होतो ?'

'उर्दूचा व्यवहारात उपयोग काहीही नाही. कुठेही कामाला गेलं तरी मराठीच बोलावं लागतं. पण उर्दू हो आमच्या धर्माची भाषा आहे. म्हणून आम्ही ती शिकतो. आमच्या मुलीही उर्दू शिकतात.'

'तुमच्या मुली फार दूरवर देतात काय ?'

'नाही. आम्ही मुलींची शादी जवळपासच्या खेड्यातच करतो. सहसा तालुक्याची हद्द सोडत नाही.'

'कोकणी मुसलमानांची उपजीविका कशावर चालते ?'

'आम्ही सगळेजण होडीवाले आहोत. होड्या चालवणं आणि मासे पागणं हेच आमचे दोन धंदे.'

'तुमची शेती आहे ?'

'छे-छे ! एकाही मुसलमानाची शेती नाही. पूर्वी होती म्हणतात. ती गेली. आता खाडी काठांवर घराची वीतभर जागा असते नि त्यात सहा सहा वाटेकरी असतात. ह्या जागेच्या नि जमिनीच्या प्रश्नावरून डोकं फिरायची पाळी आल्याय.'

'तुमची तरणी पोरं नव्या धंद्यात शिरत नाहीत ?'

'आमच्या पोरग्यांना शिक्षण नको ! हे आमचं खरं दुःख आहे. जेमतेम आठवी दहावीपर्यंत जातात नि परत होडीवर वल्हं मारायला येतात. कशी बरकत येणार सांगा ? '

'तुमचे लोक आफ्रिकेत खूप पैसा मिळवतात म्हणे.'

'ते खोटं आहे. मुरुड, जंजिरा, खेड वगैरे भागातले मुसलमान खलाशी आफ्रिकेत आहेत. दक्षिण कोकणातले कोणीही नाहीत. असलाच तर एखाद दुसरा असेल.'

'मासळीवर तुम्हाला भरपूर पैसे सुटतात ?'

'भरपूर कुठले सुटणार ? पण मासळीला हमेशा गिऱ्हाईक असतं. एक काळ

पृष्ठ ५८ वर

# मुक्काम पुणे

## पंचावन्न विरुद्ध तीन

**शरद कृष्णन्**

तसं पाहिलं तर पुणेकरांचा जिल्हा परिषदेशी डायरेक्ट संबंध नाही. परंतु पुणे महानगरपालिका व महाराष्ट्र विधानसभेतील पुण्याच्या जागांबद्दल त्यांना गोडी आहे. त्या निवडणुकीच्या राजकारणाची मुळे जिल्हा परिषदेच्या राजकारणात गुंतलेली आहेत. जिल्हा परिषदेला असलेले अधिकार आणि तिची आर्थिक शक्ती यामुळे विधानसभेच्या आमदारकीपेक्षा जिल्हा परिषदेच्या एखाद्या समितीच्या अध्यक्षपदाची गोडी 'जाणकार' मंडळींना जास्त वाटते.

जिल्हा परिषदेच्या खुर्चीकडे नेणारी सार्वत्रिक निवडणुकीची प्राथमिक फेरी सार्वत्रिक निवडणुकीने पूर्ण झाली. लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीत काहीशा अनपेक्षितपणे जे आले, नंतर विधानसभेच्या निवडणुकीत जे अपेक्षेप्रमाणे आले, ते काँग्रेस विजयाचे प्रचंड वारे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत त्याच वेगाने येऊन थंडावले. तेवीस जिल्हा परिषदांपैकी एकवीस जिल्ह्यांमध्ये सत्ताधारी काँग्रेस विजयी झाली. निर्णायक बहुमत मिळाल्याने काँग्रेस राजवटीचं खटलं तेथे पुढेही सुरू राहील. आता आमची पुण्याची जिल्हा परिषद या वाहत्या प्रवाहाच्या विरुद्ध जाणार आहे होय ? नाव नको. जिल्हा परिषदेच्या एकण अठ्ठावन्न जागांपैकी सत्तेचाळीस जागा समाजवाद आणायला वचनबद्ध असलेल्या काँग्रेसने जिंकल्या. खास पराक्रमाने विलक्षण गाजलेले झेड्. पी. चेअरमन शंकरराव उरसळ यांना तिकीट नाकारले गेले, हे जनतेचे भाग्य. अन्यथा कोणी सांगावे, लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार झालेले शंकरराव पुन्हा तिसऱ्या टर्मसाठी जिल्ह्यातली सगळ्यात महत्त्वाची खुर्ची अडवून बसले असते. ◻

## काँग्रेसचे स्वरूप बदलले !

निवडणुकीमध्ये काँग्रेसला यश मिळाले असले तरी काँग्रेसला जे मक्तेदारी स्वरूप आले होते ते या निवडणुकीपूर्वीच मोडण्यात आले. तिकीट-वाटपाच्यावेळी ३३ जुने सदस्य घरी बसवण्यात आले. त्यातही विविध कारणांमुळे जी मंडळी बदनाम झाली होती त्यांची रवानगी घरी झाल्याने नव्याने काँग्रेसकडे आकर्षित झालेली मंडळी संतुष्ट होती. तर जुन्या बाराची मंडळी वरून नरमाईने वागत असली तरी आतून ठुसठुसत होती. अर्थात उघडपणे कोणतीही कारवाई करणे त्यांना शक्य नव्हते. काही बंडखोरांची पाठ थोपटण्याची कामगिरी त्यांनी बजावली, परंतु आपले बंडखोर स्नेही आत पाठवण्यातही ते यशस्वी झाले नाहीत. याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अण्णासाहेब मगर यांचे बंडखोरीविरुद्धचे ताठर धोरण. मिळालेल्या सर्वाधिकाराचा फायदा घेऊन त्यांनी एका फतव्याने सातही बंडखोर जमीनदोस्त केले. त्या सर्वांचे प्राथमिक आणि क्रीयाशील सदस्यत्वही रद्द केले. या निर्णयाने अन्य मंडळी सावरून बसली. काकासाहेब भेलके आणि मामासाहेब मोहोळ यांचा जिल्हा पातळीवरील राजकारणातील विशेषत: काँग्रेस अंतर्गत राजकारणातील हा प्रभाव कमी झाल्याचे खचित जाणवले.

### विरोधकांचे अडाखे चुकले

जिल्हा परिषद निवडणूक काँग्रेस जिंकणार हे सांगायला ज्योतिषाची गरज नव्हती. अठ्ठावन्न जागांपैकी आठ जागा या मंडळींनी निवडणुकीचे निनाद उठण्यापूर्वीच चोख बिनविरोध खिशात घातल्या होत्या. जिथे निवडणुका होणार तेथेही काँग्रेसचा जोर सुस्पष्ट होता. तथापि काँग्रेस अंतर्गत बंडखोरी, काही विभागातील स्वत:च्या पक्षाचे काम आणि सुमारे ३२ मतदारसंघामध्ये झालेले सरळ सामने या मुद्द्यांच्या आधारे विरोधी पक्ष काही अपेक्षा बाळगून होते. विशेषत: मावळ, आंबेगाव, भोर, खेड, बारामती, शिरूर आदी तालुक्यात आपल्याला यश मिळेल असा त्यांचा अंदाज होता.

परंतु ही निवडणूक खऱ्या अर्थाने विरोधी पक्ष व काँग्रेस यांच्यामध्ये झालीच नाही. अधिकृत काँग्रेसविरुद्ध बंडखोर काँग्रेस यांच्यामध्येच खरे सामने झाले. आता अठ्ठावन्न सदस्यांच्या सभागृहामध्येही सगळ्यात मोठा विरोधी पक्ष बंडखोर काँग्रेसवाल्यांचा ! ४७ काँग्रेस, ८ बंडखोर काँग्रेस (अपक्ष), २ समाजवादी आणि राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसला पर्यायी पक्ष होऊ पाहाणाऱ्या जनसंघाचा १ सदस्य असे हे नवीन सभागृहाचे चित्र आहे.

जिल्हा परिषदांचे महत्त्व नागरी मंडळींना अद्यापही उमगलेले नाही. ससून हॉस्पिटलजवळ असलेली जिल्हा परिषद इमारत पुणेकर उपेक्षेच्या नजरेने पाहतो.

शिक्षकांच्या बदल्यापासून, ते रस्ता बांधणीपर्यंत जिल्ह्याची सर्व सूत्रे या यंत्रणे-मार्फत हालतात. सत्ता विकेंद्रीकरणाची कल्पना आकाराला आल्यानंतर जिल्हा परिषदेला विलक्षण महत्त्व प्राप्त झाले आहे. निवडणुकीतील यशाने काँग्रेसने जिल्ह्यावरील अनिर्बंध सत्तेची आणखी पाच वर्षे पदरात पाडून घेतली आहेत. बंडखोर काँग्रेसवाले तर जुने दोस्तच आहेत. आता दोन समाजवादी (दोन्ही पुरंदर) व एक जनसंघी (वडगाव मावळ) असे एकूण तीन बहुमताच्या या प्रचंड शक्तीपुढे कसा टिकाव धरतात ते पाहायचे !

## ऑलेम्पिकसाठी भारतीय कुस्तीगिर

केवळ पदकांचा आणि मिळालेल्या सन्मानाचा विचार करायचा तर ऑलेम्पिकच्या दृष्टीने आपण अक्षरशः नगण्य आहोत. हॉकीचे हुकमी असे एकमेव सुवर्ण पदक पूर्वी मिळायचे. परंतु आता तेही दुर्लभ झाले आहे. यश मिळाले नाही तरी प्रयत्न सोडून कसे चालणार, स्वाभाविकपणेच म्युनिच ऑलेम्पिकच्या नौबती गर्जू लागल्याबरोबर क्रीडा क्षेत्राला एक नवी टवटवी आली. ऑलेम्पिकसाठी विशेष प्रयत्न सुरू झाले.

पुण्याच्या कुस्ती शोकिनांनाही मॅटिंग कुस्ती फारशी परिचयाची नाही. तांबड्या मातीत समोरच्या मल्लाला आस्मान दाखवणारा – गणपत आंदळकर, मारुती माने, श्रीपती खचनाळे त्याला जास्त प्रीय वाटतो. तांबड्या मातीतील नुरा कुस्त्याचे नकली नाटकही केवळ तांबड्या मातीच्या प्रेमापोटी हा कुस्ती रसिक चवीने पाहतो. जिंकल्या पैलवानाला खांद्यावर घेऊन जमलेली मंडळी विजयी जयघोष करत आपल्या आखाड्याकडे परत जातात. आता हे तांबड्या मातीचे तंत्र ऑलेम्पिकला कसे चालणार ऑलेम्पिकच्या मॅटिंग कुस्तीचे तंत्र न जमल्याने तांबड्या मातीत मोठे यश मिळवणारा पैलवान मॅटिंगवर निकम्मा झाला आहे.

आता हे टाळायचे असेल आणि ऑलेम्पिकमध्ये यश मिळवायचे असेल तर सराव केलाच पाहिजे. ऑलेम्पिकसाठी ज्या कुस्तीगिरांचा विचार करण्यात आला, अशा निवडक ४० कुस्तीगिरांचे शिबिरं पुण्यात १७ मे ते ५ जून पर्यंत चालविण्यात आले. शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक होते बाळासाहेब लांडगे. मार्गदर्शनाचा लाभ सर्वांना मिळाला असला, तरी ऑलेम्पिकसाठी जाणाऱ्या भारतीय कुस्तीगिरांची निवड करण्याचे दृष्टीने अंतर्गत चाचण्या आवश्यक होत्या. या चाचण्या नुकत्याच पार पडल्या असून चाचणीच्या आधारे, सात मल्लांची निवड जाहीर करण्यात आली आहे. ऑलेम्पिकला सात कुस्तीगिर पाठवण्यात यावेत असे भारतीय ऑलेम्पिक अॅसोसिएशनने ठरवले आहे. या सात मंडळीमध्ये महाराष्ट्राचा मारुती

अडकर सहाव्या क्रमांकावर आहे. जगातील नामवंत पैलवानांमध्ये स्थान मिळवलेला सुदेशकुमार बावन्न किलो गटामध्ये खेळत असल्याने मारुतीची निवड अठ्ठेचाळीस किलो गटासाठीच झाली आहे. अठ्ठेचाळीस आणि बावन्न अशा दोन्ही गटांतील चाचणी कुस्त्यांमधून मारुतीने चांगले प्रावीण्य दाखले आहे. आता सर्व खेळांचे चित्र स्पष्ट होऊन अंतिम यादीमध्ये सहा मल्ल जरी जाऊ शकले तरी मारुतीचा क्रमांक लागून जाईल. चाळीस मल्लांचे हे जे शिबिर झाले. त्याची व्यवस्था पुष्कळ समाधानकारक होती. प्रत्येक मल्लाला दहा रुपये रोख रोज देण्यात येत असत. खुराक चालू ठेवायला या रकमेचा उपयोग होई. चाळीस-मल्लातून जे सात मल्ल निवडले आहेत. ते केवळ गुणांवर निवडले आहेत. असे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल. अन्यथा सेनादलाचा प्रतापसिंग संपूर्णपणे दुर्लक्षीला गेला नसता.

आता निवड झालेल्या मंडळींवर भरपूर मेहनत घेतली जाणे आवश्यक आहे. या दृष्टीने निवडलेल्या मल्लांसाठी जून, जुलै, ऑगस्ट, अशा तीन महिन्यांत पुण्यामध्ये प्रत्येक वेळी तीन आठवड्यांचे एक अशी तीन शिबिरे भरवण्यात येणार आहेत. या शिबिराचे मार्गदर्शनादी श्री. लांडगेच करतील.

आपल्या मल्लांकडून मोठ्या आपेक्षा निदान मी तरी ठेवत नाही. सुवर्णपदक आणले तर कोणाला नको असातला भाग नाही. रौप्य, ब्रांझ पदके तरी आणण्याची जबाबदारी कुस्तीगिरांना उचलावी लागेल.

□ □ □


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

गेल्या आठवड्यात
९ जूनला
संगीत दिग्दर्शक
वसंत देसाई
यांचा
६० वा वाढदिवस
साजरा झाला.

---

संगीत दिग्दर्शक

# वसंत देसाई

---

**देवीदास बागूल**

'गुड्डी' सिनेमाचा बोलबाला झाला म्हणून पाहायला गेलो आणि प्रत्यक्षात मात्र एक वेगळीच पण फार चांगली गोष्ट ऐकायला मिळाली. 'बोलरे पपीहरा' हे त्या सिनेमातले गाणे इतके मनोवेधक होते, की त्या गाण्याच्या संगीतकाराची चौकशी केली. चौकशी करण्याची पाळी आली. कारण 'गुड्डी' सिनेमाच्या पोस्टर्स-वर नेहमीच्या लोकप्रिय संगीतकारांची नावे नसल्याने असलेले नाव लक्षात राहिले नसावे. आज सिनेमाच्या पोस्टर्सवर ज्या चारपाच संगीतकांची नावे असल्याने सिनेमा पाहण्याची



सुगीचे दिवस संपले
हे खरे,
पण सुगीचे दिवस
आले होते हेही
खरेच.

ओढ लागते त्यात 'गुड्डी 'च्या संगीतकाराचे नाव काही बसणार नाही.

पण म्हणून काय झाले ?

'वसंत देसाई' हे नाव आज पोस्टर्सवर प्रभावी वाटत नसले तरी ज्यांनी 'झनक झनक पायल बाजे' आणि 'गुंज उठी शहनाई' ऐकली आहे त्यांच्या हृदयातून हे नाव स्मरणाच्या स्पर्शाने केव्हाही उमलत राहील.

बोल रे पपीहारा या गाण्याने हृदयातील ते नाव पुन्हा एकदा प्रसन्नपणे उमलले.

त्या उमललेल्या फुलाची एकेक पाकळी अजून मनमोहक आणि ताजी टवटवीत होती...

## यशाची मातब्बरी

...'आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी रे! करू काम स्मरू नाम, हे गीत 'ज्ञानेश्वर' चित्रपटात गाणारे वसंत देसाई पुढे संगीत दिग्दर्शक झाले. कितीतरी विविध चालींची गाणी त्यांनी सादर केली. पण म्हणून 'ज्ञानेश्वर' चित्रपटात म्हटलेले ते साध्या चालीतले गाणे कधी कोमजले नाही.

आज जरी पोस्टर्सवरील त्यांचे नाव आकर्षक वाटत नसले तरी एकेकाळी याच वसंत देसाईंनी लोकप्रियतेची शिखरे निःशंकपणे गाठली आहेत. 'शंकुतला' या चित्रपटातील वसंत देसाईची गाणी तेव्हा लोक भावुकपणे म्हणत असत. 'कमल है मेरे सामने,' हे संथ लयीतले गाणे जो तो दिवसभरात नकळतपणे गुणगुणत असे. संथ लयीतले गाणे लोकप्रिय होणे किती अवघड असते याची कल्पना असेल तर वसंत देसाईंच्या त्या यशाची मातब्बरी वाटल्याशिवाय राहाणार नाही.

संथ लय रसमय करणाऱ्या या संगीतकाराचे नाव 'रामजोशी 'च्या पोस्टर्सवर पाहिले, तेव्हा मात्र थोडा विस्मय वाटला, वाटले की डफ-ढोलकीच्या कडकडाटात आणि तिकोनाच्या किर्णाकणाटात हा संगीतकार आपले नाजूक कोमल सूर गुंफणार तरी कसे? सवालजबाबाच्या थयथयाटात हा प्रीतीचे सूर भरणार तरी कसे? मराठमोळा लावणीत दाखवून दाखवून हा माणूस कोणते सुंदर रंग दाखविणार ?

पण जेव्हा 'सुंदरा मनामधी भरली' ही लावणी कानावर पडली तेव्हा सगळे संशय प्रकाशातल्या धुक्याप्रमाणे विरून गेले आणि लावणींना एक नवकळा चढलेली पाह्यला मिळाली. 'रामजोशी' सिनेमापासून लावणी संगीताला एक नवजीवनच मिळाले. सवाल जबाबाला द्वंद्वगीतांचे सौंदर्य लाभले. पण असे करताना मूळ ढोलकी संगीताला वसंत देसाईंनी कुठेही गुदमरून टाकले नाही. 'एकवार सांगते कान्हा' या गाण्याच्या आरंभीची ढोलकी ऐकली म्हणजे पुढच्या अक्कडबाज ताकदीची वातावरण-निर्मिती पुरेपूर होते. त्या गाण्यातील कृतककलहाची भावना वसंत देसाईंनी शिगेला पोचवण्यात फार कौशल्य दाखवले आहे आणि त्या चित्रपटात ज्या प्रमाणे 'सुंदरा मनामधी भरली' या प्रथम म्हटलेल्या लावणीला नंतरच्या दुसऱ्या प्रसंगात

म्हटलेल्या त्याच लावणीला सर येत नाहीं त्याचप्रमाणे ' रामजोशी ' चित्रपटातील 'लावणीसंगीताची ' सर नंतरच्या चित्रपटातील फार थोडया गाण्यांना मिळाली. इतरांची तर गोष्टच सोडा, पण खुद्द वसंत देसाईंनीच संगीत दिलेल्या 'अमर भूपाळी ' चित्रपटाचीच गाणी घ्या. त्यातील ' लटपट लटपट तुझं चालणं ' हे एक गाणं सोडलं तर ' रामजोशी 'तल्या लावणीची धुंदी इतर गाण्यांना चढली नाही.

पण अमर भूपाळीच्या गाण्यांमधून वसंत देसाईंनी जी रूपे दाखवली तीही हृदयस्पर्शी झाली. होनाजीच्या भूपाळीला त्यांनी द्वंद्वगीतातून सादर केली हीच गोष्ट अत्यंत अभिनव होती. होनाजीची ही भूपाळी लेखनस्वरूपात एकमुखीच दिसते. अमके चरण ह्याने तमके चरण दुसऱ्याने असे काही त्या भूपाळीत नाही. वसंत देसाईंनी संगीत दिलेल्या भूपाळीत स्त्रीपुरुषांचा नाटयमय आवाज योजून त्या गीतातील वात्सल्य परिपूर्ण स्वरूपात उभे केले आहे. वसंत देसाईंनी संगीत दिलेली ही भूपाळी अमर होण्यात ज्या इतरांचे श्रेय आहे त्यात, लताचा आवाज आणि वसंत देसाईंचे संगीत ह्यांना प्रमुख स्थान द्यावे लागेल. मला तर असे वाटते, की त्या गाण्यात वसंत देसाईंनी हार्मनीचे जे प्रयोग केले आहेत, ते फारच हृद्य आहेत. सकाळचे प्रसन्न वातावरण जोपर्यंत मानवी मनाला प्रफुल्लित करील तोपर्यंत वसंत देसाईंची अमर भूपाळी मनाला प्रकाशित करीत राहील.

## तुझ्या प्रीतीचे दुःख मला....

' अमरभूपाळी 'तील आणखी एक गाणे वसंत देसाईंची आठवण देण्याचे कार्य करीत राहील. ते गाणे म्हणजे ' तुझ्या प्रीतीचे दुःख मला दावू नको रे ' ह्या लावणीला भावगीताच्या पातळीवर नेण्यात वसंत देसाईंनी फार योजकता दाखवली आहे. त्या गाण्यातील ' दावू नको रे, ' ' ठेवू नको रे, ' ' रानभरी होऊ नको रे ' ह्या शब्दांना दिलेला आर्त आलाप हृदय विंधून गेल्याशिवाय राहात नाही. मला जर वसंत देसाईंच्या सर्व प्रकारच्या गाण्यातून कोणत्या एकाच गाण्याची निवड करण्याचा प्रसंग आला तर मी ह्याच गाण्याची निवड करीन, इतके हे गाणे उत्कट आणि विदेही करणारे आहे.

करुण रसाचा परिपोष साधण्याच्या बाबतीत वसंत देसाईंनी दाखविलेली ही क्षमता ' गुंज उठी शहनाई 'मधील गाण्यातून पुरेपूर उमटलेली दिसते. विशेषतः ' दिलका खिलौना टूट गया ' ह्या गीतात लताने जे करुण आलाप घेतले ते विस्मयचकित करणारे होते. वसंत देसाईंनी ह्या चित्रपटातील प्रत्येक गाणे श्रवणीय केले. तसेच दुसरेही एक अभिनव कार्य केले. त्या चित्रपटातील गाण्यांचे कौतुक आणि मर्मदर्शन दाखवणे अवश्य असले तरी सोपे आहे. पण जे अभिनव कार्य केले असे मी म्हणतो ते हे की, त्यांनी बिसमिल्लांच्या सनईला चित्रपट-प्रेक्षकांची लाखलाख हृदयसिंहासने मिळवून दिली. तोपर्यंत बिसमिल्ला शास्त्रीय-संगीत-श्रोत्यांच्या कक्षेतच होते. फार तर रेडिओच्या प्रभातवंदनातून सर्वगामी झाल्यासारखे वाटत

होते. पण 'गुंज उठी शहनाई 'मुळे बिसमिल्लांना लोकांची आमंत्रणे येऊ लागली. पुण्या-मुंबईच्या त्यांच्या मैफली आठवल्या म्हणजे बिसमिल्ला त्या काळी कसे आणि किती लोकप्रिय झाले होते हे समजून येईल. एका वाद्याला लोकप्रियतेचे हे लाभलेले परिमाण अपूर्व होते. बिसमिल्लांना मैफलीत 'गुंज उठी 'मधील गीते वाजवण्याची फर्माइश व्हायची आणि बिसमिल्ला ही मागणी आनंदाने पुरी करायचे. एक शास्त्रीय वादक फिल्मी गाण्यांची आवड पेश करतो, ही घटना शास्त्रीय संगीताच्या विश्वात अभिनव होती. रविशंकरने संगीत दिलेला 'अनुराधा' त्यातील गाण्यांसकट लोकप्रिय झाला, पण नंतरच्या मैफलीत रविशंकरना फर्माईश करायला चित्रपट-प्रेक्षक कधी आले नाहीत. आणि म्हणून बिसमिल्लांना मिळालेला अनुभव अपूर्व असाच होता आणि त्यात वसंत देसाई यांचाही वाटा आहे.

## सैयां जा ऽऽ

वसंत देसाई यांच्या संगीत सामर्थ्यांचा परमोत्कर्ष दिसला तो 'झनक झनक पायलबाजे 'मध्ये. त्या चित्रपटातील एकूण एक गाणी सरस उतरली. रुचिभेदाप्रमाणे कोणी त्यात डावेउजवे करील. पण रसोत्कर्षाच्या दृष्टीतून सर्व गाणी कसोटीस उतरली. ह्या सिनेमातली 'मुरली मनोहर' आणि 'नैन से नैन' ही गाणी फार लोकप्रिय झाली. त्यातील ऋतूंचे दर्शन दर्शविणारे गाणे तर परंपरा लोकप्रिय करणारे ठरले. त्या गाण्यातील विविध रागांचे दर्शन किती विलोभनीय होते! मला तर ह्या सर्व गाण्यांचे मोल वाटतेच. पण ह्या सिनेमातील 'सैयां जा मोसे ना बोलो अब ना मोहे सताओ' ह्या गाण्याचे जे एक अंग कुमार गंधर्वांनी उकलून दाखवले ते फार मोलाचे वाटते. कुमार गंधर्व म्हणतात की, लता मंगेशकरच्या आवाजाचा करुण गाण्यासाठी संगीतकारांनी जसा उपयोग करून घेतला तसा शृंगार-रसासाठी करून घेतला नाही. 'सैयां जा मोसे ना बोलो' या गाण्यात लताचा आवाज शृंगार-रसालाही किती पोषक आहे ह्याचे विलोभनीय दर्शन घडते.

मला वाटते की, वसंत देसाईंना मिळालेला हा सर्वांत मौल्यवान धन्यवाद आहे. एका प्रतिभाशाली आणि क्रांतीकारक गायकाने केलेल्या गुणग्रहणापेक्षा अधिक हृदयस्पर्शी काय असणार?

'झनक झनक' नंतर वसंत देसाईंचा बहर फारसा कुठे जाणवला नाही. त्यांचे एखादे गाणे मनात कायमचे घर करून राही. 'आशिर्वाद 'मधील 'झिर झिर बरसे सावनी अखियाँ हे गाणे असेच एकदम मनाला भिडले. पण सुगीचे दिवस संपले होते हेच खरे. मात्र सुगीचे दिवस आले होते हेही खरेच. नव्हे, ते असे येऊन गेले आणि तृप्ती देऊन गेले की नंतरच्या काळात त्यांची स्मृती नेहमी मन गाते— गुणगुणते करणारी राहिली.

# ढाका डायरी थेके

सौ. तारा पंडित

बंगाली पंचांगानुसार २५ बैशाख ही टागोरांची जन्मतिथी. स्वतंत्र बांगला देशाच्या लोकांनी ह्या तिथीचे स्मरण ठेवले; आणि ठिकठिकाणी धूमधडाक्याने रवींद्रजयंती साजरी केली. आपल्या आवडत्या कविगुरूंना प्रेमाने श्रद्धांजली वाहिली. तेथील एका इंग्रजी वृत्तपत्रानुसार– 'टागोरांनीच ही मातृभूमी स्वतंत्र आणि सार्वभौम स्वरूपात जनतेला प्राप्त करून दिली–ज्या भूमीवर अनेक स्वप्ने, उद्दिष्टे आणि ध्येये साकार होत आली.'

रवींद्रनाथ म्हणजे वंगवंधूंचे स्फूर्तिस्यानच. कविगुरूंची 'संचयिता' ते सतत जवळ बाळगतात. 'सोनार बांगला' हे त्यांचे आवडते काव्य. वंगवंधू म्हणाले— 'आता टागोरांना आपले म्हणण्याचा अधिकार आपण प्राप्त करून घेतला आहे, कारण त्यासाठी आपण आपले रक्त सांडले आहे.' ह्या शुभप्रसंगी शेखसाहेबांनी जनतेला संदेश दिला, टागोरांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण केला; आणि टागोरांच्याच ओळींचे उच्चारण केले, म्हणाले——

बिपदे मोर–ए रख्खा करो ए नाहे मोर प्रार्थना
बिपदे आमी ना जेनो कार भाई।

(संकटाच्या वेळी माझे रक्षण करावे अशी मी प्रार्थना करीत नाही. कारण कोण जाणे, संकटाचे वेळी मी कोणाचे बधुत्व पत्करेन ते !)

बंगाली अकादमीने एक समारंभ आयोजित करून वटवृक्षाखाली भरवलेल्या सेमिनारमध्ये टागोरांच्या जीवन आणि साहित्यकृतीवर चर्चा घडवून आणली. अनेक विद्वानांनी त्यात भाग घेतला. ढाक्का येथील सुप्रसिद्ध कलावंतांनी रवींद्र-गीतांचे गायन केले. कार्यक्रम सपल्यावर डॉ. मोनिरुज्झमान भलतेच खुषीत येऊन

म्हणाले–' कल्पना करा, आज बांगला देशाच्या स्वतंत्र भूमीवर मुक्त हवेमध्ये श्वासोच्छ्वास करीत टागोरांचा जन्मदिवस साजरा करताना आमचा ऊर आनंदाने किती भरून आला असेल ? आता आम्हाला भारताचे एजंट म्हणून कोणीही म्हणू शकणार नाही. '

बांगला देश सरकारने सेलाईदाह कुठीबारी येथे तीन दिवसांचा विशेष कार्यक्रम आयोजित केला. शोभा-स्मृति-संघ ह्या संस्थेने पद्मेच्या काठी असलेल्या जयपारा नावाच्या खेड्यात समारंभ घडवून आणला. टागोरांना प्रिय असलेली हिरवीगार आणि सोनेरी सृष्टी तेथून स्पष्ट दिसते. काही प्रसिद्ध भारतीय कलावंतांनीही त्या समारंभात भाग घेतला होता. त्यात सुचित्रा मित्र ह्याही होत्या. बुलबुल अकादमी ऑफ फाईन आर्टस् ह्या संस्थेने टागोरांचे श्यामा हे नाटक सादर केले. वर्तमानपत्रांनी खास लेख प्रसिद्ध करणारे खास अंक काढले.

ढाक्क्याच्या गोपीबाग विभागातील रामकृष्ण मिशनची इमारत पाकिस्तानी सैन्याच्या गोळ्यांचे व्रण धारण करून अजूनही तशीच उभी आहे. आतापर्यंत सुप्तावस्थेत पडलेल्या ह्या इमारतीत हळूहळू हालचाल होऊ लागली आहे. अलीकडे नियमितपणे पूजा, होम, आरती इ. कार्यक्रम होत असतात. स्वातंत्र्यानंतर एक स्वामीजी कलकत्त्याहून येथे आले व त्यांनी सर्व जबाबदारी स्वीकारली. पाकिस्तानी सैन्य आणि रझाकार यांनी मिळून आश्रमाची बरीच नासधूस केली होती व तेथील अनेक वस्तू लांबवल्या होत्या. तरीदेखील इमारत पूर्णत: जमीनदोस्त झाली नाही हे भाग्यच. भयंकर हल्ल्यातून ती कशी सुरक्षित राहिली त्याबद्दलची हकीगत जवळपास राहणाऱ्या एका माणसाने सांगितली. तो म्हणाला–आश्रमाच्या लोकांना जेव्हा पत्ता लागला, की त्याच विभागात राहाणारे एक मौलाना सैन्याची व रझाकारांची मदत घेऊन इमारत संपूर्णपणे नष्ट करणार आहेत, तेव्हा ते सर्व मिळून त्या मौलानाकडे गेले व त्याला ह्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पटवून सांगितले की इमारत नष्ट करू नये. पुढेमागे तेथेच एक शाळा स्थापन करता येईल व शाळेला नाव मौलानांचेच देता येईल. ही सूचना त्यांना मनापासून पसंत पडली आणि इमारतीचे अशा तऱ्हेने संरक्षण झाले, ते मौलाना मात्र आता बेपत्ता आहेत......

ढाक्का युनिव्हर्सिटी सेंट्रल स्टुडंट्स् युनियन (DUCSU)चे सभासदांनी एक नवी योजना आखली. पाकिस्तानी सैन्याकडून मारला गेलेला विद्यार्थीवर्गाचा आणि शिक्षकांचाही आवडता मधुदा वीस वर्षे सतत कॅंटीन चालवीत होता. मधुदाला ओळखत नाही असा एकही विद्यार्थी नव्हता. ह्या कॅंटीनमध्ये बसूनच विद्यार्थी वर्ग आवेशात राजकारणाचे चर्विच्चरण करीत असे. मधुदाचे वागणे अत्यंत प्रेमळपणाचे होते. ह्याच मधुदाच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांनी 'मधुर कॅंटीन' चालवायचे ठरविले आहे. त्याच्या पायाभरणीचा समारंभ उपकुलगुरूंच्या हस्ते पार पडला. ह्याशिवाय

मधुदाच्या नावे एक लायब्ररीदेखील चालवण्यात येईल, ज्यामुळे गरीब आणि अभ्यासू विद्यार्थ्यांना फार मदत होऊ शकेल.

पंतप्रधान शेख मुजिब यांना लाईफ मेंबरशिप प्रदान करण्याच्या हेतुने ढाक्का युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी एक समारंभ घडवून आणला. वंगबंधू येण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या एका गटाने घोषणा करीत करीतच सभामंडपात प्रवेश केला. तेथे अगोदरच उपस्थित असलेल्या दुसऱ्या एका गटाने प्रतिघोषणा करण्यास सुरुवात केली. एक गट म्हणायचा–'कॉम्रेड मुजिब लाल सलाम'; 'समाजवाद कायम करो'; 'बिभेदकारी निपट जाक' (भेदभाव नष्ट होवो). यांना प्रतिसाद देत दुसरा गट म्हणायचा–'बंगबंधू जिंदाबाद'; 'जाती जदि बाजते जाओ, मुजिब बादेर पथ 'नाओ' (जातीभेद टिकवायचा असेल तर मुजिबच्या विरुद्ध मार्गाचा अवलंब करा); 'मुजिबबाद कायम करो' (मुजिबवाद कायम करा); इत्यादी हा आरडाओरडा विद्यार्थ्यांनी थांबवावा म्हणून अनेक प्रयत्न झाले; पण ते सारे निष्फळ ठरले. अखेर वंगबंधूचे आगमन झाले. त्याबरोबर दोन्ही गटांच्या विद्यार्थ्यांनी त्यांना गराडा घातला आणि जोरजोरात घोषणांचे प्रतिध्वनी उमटू लागले. शेखसाहेबांनी मोठ्या मुष्किलीने त्यांना शांत केले. कार्यक्रमाला सुरुवात झाली. औपचारिक मानसन्मान होताच श्री. अबदुर रब यांनी आपल्या भाषणात घोषणा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर टीका केली व म्हटले की 'मुजिबिझम'च्या नावाखाली चुकीची वर्तणूक ते करीत आहेत. हे ऐकून काही काही विद्यार्थी संतापले व त्यांनी वक्त्यांना उद्देशून घोषणा देण्यास सुरुवात केली. त्यांच्या घोषणा सुरू होताच दुसऱ्या गटानेही त्याच मार्गाचा अवलंब केला. सर्वत्र एकच गोंधळ उडाला. शेख मुजिब रागावले आणि हा आरडाओरडा थांबला नाही तर मी येथून निघून जाईन असे त्यांनी धमकावून सांगितले. एकदाची पुन्हा शांतता प्रस्थापित झाली आणि कार्यक्रम सुरळीत पार पडला. शेखसाहेब आपल्या भाषणात म्हणाले, मुजिबवादाच्या नुसत्या घोषणा करण्याने काहीही साध्य होणार नाही. तसे आचरण केले पाहिजे.' विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये व शिस्तभंगही करू नये असा त्यांनी उपदेश केला. ते म्हणाले की शालेयजीवनापासून त्यांनी स्वतः राजकारणात उडी घेतली होती; परंतु आपल्या शिक्षकांना ते कधीही अप्रिय झाले नव्हते. वंगबंधूंना त्याच वेळी एक फोटोस्टॅट कॉपीही देऊ करण्यात आली. त्यात १९४८ साली युनिव्हर्सिटीत हरताळ करण्याचे अयोग्य कृत्य केल्याबद्दल ढाक्का युनिव्हर्सिटीने त्यांना दिलेला हद्दपारीचा हुकूम होता.

□ □ □

# करंबेळी
# हेमर्डी
# शेडाशी
## (ता. – पेण)

पेण तालुक्यातील करंबेळी वा शेडाशी या गावातील ६६ आदिवासी स्त्री-पुरुषांनी ता. २३ मे रोजी आपल्या जमिनीसाठी सत्याग्रह केला. त्यामुळे त्यांच्या गाऱ्हाण्याला वर्तमानपत्रातून अस्पष्टशी का होईना बाचा फुटली आहे. पण या प्रश्नाची पार्श्वभूमी व स्वरूप आणि विशेषतः सरकारी अधिकाऱ्यांचे वर्तन यासंबंधीची तपशीलवार सत्यस्थिती जनतेसमोर मांडणे जरूर आहे. ज्या कातकऱ्यांच्या जमिनी आज लुबाडल्या जात आहेत ते पिढ्यान्‌पिढ्या या भागातील जमीनदारांच्या जमिनी कूळ या नात्याने कसत आले आहेत. १९५८ साली 'कसेल त्याची जमीन' या कायद्यानुसार ही कुळे जमिनीचे 'मालक' बनले. अर्थात पूर्ण मालकी मिळण्यापूर्वी या जमिनीच्या किंमतीचे हप्ते भरणे कायद्याप्रमाणे आवश्यक होते. पण प्रथम १९६४ पर्यंत मुळी जमिनीच्या किमतीच ठरल्या नाहीत. त्या ठरल्यानंतर मग हप्ते भरण्याची प्रक्रिया सुरू झाली. बहुसंख्य आदिवासींना एकदीड एकरापेक्षा कमीच जमीन मिळाली होती. त्यामुळे बेताचे उत्पन्न व वाढता खर्च यांची तोंडमिळवणी करणेच अशक्य झाल्या कारणाने हप्ते भरणे जमले नाही. १९६६ साली तहशीलदाराने या आदिवासींना, हप्ते भरा नाहीतर तुमची जमीन जप्त करण्यात येईल अशा नोटीसा दिल्या. वस्तुतः कूळकायद्याप्रमाणे हप्ते थकलेली अशी प्रकरणे महाराष्ट्रात सापडतील. मग या शेसवाशे कातकऱ्यांमागेच हप्ते भरण्याचा तगादा का लावला हे समजून घेणे जरूर आहे. १९६४ च्या सुमारास कोयना प्रकल्पामुळे ज्यांच्या जमिनी गेल्या अशी काही कुटुंबे या भागात राहावयास आली. त्यांना

नुकसानभरपाईचे पैसे मिळाले होते पण जमिनी नव्हत्या. तेव्हा काही दलालांनी या प्रकरणात लक्ष घातले. तहशीलदार कचेरीतले लोक, हे दलाल व कोयनेवाले या सर्वांनी मिळून हा डाव रचला असावा. तहशीलदार कचेरीने तगादे लावून आदिवासींना हप्ते न भरल्यास जमिनी जातील म्हणून घाबरवून सोडावयाचे, दलालाने आदिवासींची व कोयनेवाल्यांची गाठ घालून द्यावयाची व कोयनेवाल्यांनी त्यांना फसवून त्यांच्या जमिनी लाटावयाच्या अशी योजना आखण्यात आली. आदिवासी भागात सर्वत्र अशी प्रथा आहे, की सावकारांकडून अडचणीच्या वेळी पैसे घ्यावयाचे व त्याबदलात आपली जमीन ठराविक मुदतीने त्याला कसावयास द्यावयाची. या प्रथेनुसार कोयनेवाल्यांकडून कातकऱ्यांनी हप्ते भरण्यासाठी रकमा घेऊन आपल्या जमिनी तीन वर्षाच्या कराराने त्यांना कसण्यास दिल्या असाव्या असा कयास आदिवासींच्या सांगण्यावरून करता येतो. निश्चित काय घडले हे सांगणे कठीणच आहे. कारण हे सर्व कातकरी अत्यंत भित्रे व अडाणी आहेत. पैसे घेतल्यानंतर काही कागदावर त्यांचे अंगठे उठवून घेतल्याचे सांगतात. प्रत्यक्षात हे कागदपत्र म्हणजे त्यांच्या जमिनीची त्यांच्याकडून फसवणूक करून घेतलेली खरेदीपत्रे आहेत.

तीन-चार वर्षांपूर्वी ही खरेदीपत्रे करून घेण्यात आली. खरे म्हणजे कूळकायद्या-प्रमाणे ही खरेदीपत्रे बेकायदेशीर ठरतात व या बेकायदेशीर दस्तऐवजांच्या आधारे कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने कसलीही कारवाई करता कामा नये. पण करंवेळीला सगळाच प्रकार उलटा चाललेला दिसतो. खरेदीपत्रे झाल्यानंतर सुरुवातीची तीन वर्षे तरी ७/१२ चे उताऱ्यावर मालकी हक्क व पीकपाणी या दोन्ही सदरात कातकऱ्यांच्याच नावाचा उल्लेख आहे. ता. ३०–६–७१ चे जे उतारे तलाठ्याकडून आणले आहेत. त्यातही पीकपाण्यात कातकऱ्यांची नावे लागली आहेत. पण गेल्या वर्षी तहशीलदार कचेरीत या नावांचा फेरफार करून कोयनावाल्यांची नावे लावण्यासाठी धिसाडघाईचे प्रयत्न झाले. या प्रयत्नामध्ये कुलाबा जिल्ह्याचे पालकमंत्री यांचा हात असावा असे पेणमध्ये जाणते लोक उघड-पणे बोलतात. गेल्या वर्षी जेव्हा आदिवासींच्या कानांवर ही कुणकुण आली की आपल्या जमिनीवरची आपली नावे बदलण्याचा कट रचला जात आहे तेव्हा ते घाबरले व त्यांनी आपल्या जमिनी वाचवण्याचे प्रयत्न सुरू केले. या प्रयत्नाचा भाग म्हणून गेल्या वर्षी त्यांनी स्वत: पेरण्या व लावण्या केल्या. पेरणी किंवा लावणीच्या वेळी त्यांना कोणी आडवे आले नाही. पण कापणीचे वेळी मात्र कोयने-वाले व पोलीस दोघेही आडवे आले. विष्णू कुशा कातकरी हा आपले शेत कापण्यास गेला तेव्हा कोयनेवाल्यांनी त्याला मारहाण केली. या मारहाणीच्या वेळी पोलीस उपस्थित असून नुसते पाहात होते. ता. २३–१०–७२ रोजी तर बऱ्याचशा कोयने-वाल्यांनी जमून कातकऱ्यांच्या जमिनी कापून नेण्याचा सामुदायिक प्रयत्न केला.

या वेळी कातकरी आडवे गेले, तेव्हा कोयनेवाल्यांबरोबर पोलीसांनी देखील आदिवासींना मारहाण केली. या मारहाणीमध्ये १७ आदिवासी जखमी होऊन त्यांना पेणच्या दवाखान्यात औषधोपचार देखील करण्यात आला. यासंबंधी आदिवासींनी पोलिसांकडे केलेल्या तक्रारीची दखल देखील पोलीसांनी घेतली नाही. विशेष म्हणजे ही मारामारी होण्याचे आदल्याच दिवशी म्हणजे ता. २२-१०-७१ रोजी कातकऱ्यांचे एक शिष्टमंडळ पेण येथे मंत्री श्री. अंतुले यांना भेटले होते व त्यांनी कातकऱ्यांना तोंडभर आश्वासनही दिले होते. असे असूनही दुसऱ्या दिवशीच्या मारहाणीच्या तक्रारीची दाद पोलीसांनी का घेतली नाही ?

जबरदस्तीने पीके कापून नेल्यावर खरेदीपत्रे व पीक कापणी केली. या दोन गोष्टींच्या आधारे कोयनेवाल्यांनी ७/१२ च्या नोंदीमध्ये फेरफार करण्यासाठी अर्ज केले. या अर्जाची सुनावणी करण्याच्या बाबतीत पेणच्या तहशीलदारानी जे वर्तन केले ते अत्यंत निंद्य असे होते. वास्तविक आदिवासी हरिजन आदी मागास, शोषित व उपेक्षित जनसमुदायांना विशेष सवलतीने व सहानुभूतीने वागवावे असे सरकारचे जाहीर धोरण आहे. पण पेणच्या तहशीलदारांनी तेथील आदिवासींना विशेष सवलतीची वागणूक तर दिलीच नाही, पण सामान्यपणे कोणाही नागरिकाला जी न्यायाची वागणूक दिली पाहिजे तीही दिली नाही. या फेरफार अर्जाची चौकशी करण्यात त्यांनी जी दंडेली व घिसाडघाई केली ती पाहाता कोयनावाल्यांच्या बाजूने कारवाई करण्यासंबंधी त्याच्यावर कोणातरी उच्चपदस्थांचे दडपण आले असावे असे जे बोलले जाते त्यात बरेच तथ्य असावे.

ता. ८-१०-७१ रोजी तहशील कार्यालय येथून आदिवासींना नोटिसा पाठवून फेरफाराचे अर्ज आल्याचे व त्या अर्जाची चौकशी ता. १५-१०-७१ रोजी ठेवली असल्याचे कळवण्यात आले व त्या दिवशी त्यांना तहशील कार्यालयात जबाबासाठी बोलावले. बोलावल्याप्रमाणे ता. १५-१०-७१ रोजी सर्व आदिवासी तहशील कार्यालयात उपस्थित राहिले. आदिवासींतर्फे अशी हरकत उपस्थित करण्यात आली की, सदर नोंदीची चौकशी होण्यापूर्वी एकवार खरेदीसंबंधीच्या नोटीसीप्रमाणे


# व्होल्गा जेव्हा लाल होते

**वि. स. वाळिंबे**

**मूल्य : रुपये अठरा**

**राजहंस प्रकाशन, पुणे**

फेरफार होऊन रद्द झाले आहेत. सबब त्याच खरेदीखतांच्या आधारावर पुन्हा नोंद करता येणार नाही व म्हणून तहशीलदारसाहेब यांना सध्याच्या प्रकरणी चौकशी करण्याचा अधिकार पोचत नाही. म्हणून चौकशीचे काम निकालात काढावे. तहशीलदारांनी या मुद्द्यावर ताबडतोब निकाल न देता काम तहकूब करून या मुद्द्यासंबंधीचा निकाल राखून ठेवला. नंतर ता. २७–१०–७१ रोजी तहशीलदारांनी हा प्राथमिक हरकतीचा मुद्दा फेटाळून लावल्याचा निर्णय घेतला. तो तलाठ्यामार्फत आदिवासींना ता. ६–११–७१ रोजी कळविण्यात आला व पुढील चौकशीसाठी ता. ८–११–७१ रोजी सर्व आदिवासींना पुन्हा तहशीलदारांच्या कचेरीत बोलावण्यात आले. त्या दिवशी सकाळी ११–३० वाजता पेणचे एक वकील श्री. एम्. जी. पाटील हे आदिवासींतर्फे बाजू मांडण्यासाठी तहशील कचेरीत हजर होते. पण तहशीलदार वेळेवर कचेरीत आले नव्हते. तसेच आदिवासींना तहशीलदारांच्या प्राथमिक हरकतीसंबंधीच्या निर्णयाविरुद्ध अपील करावयाचे होते. म्हणून वकिलांनी सर्व आदिवासींना अपीलासाठी एक व पुढील तारीख मागण्यासाठी एक असे दोन-दोन अर्ज तयार करून ते तहशीलदार आल्यावर त्यांच्यासमोर सादर करण्यास सांगितले. तहशीलदारसाहेब आल्यावर, त्यांनी करंबेळीच्या लोकांना पुकारले. प्रथम लक्ष्मण भिवा याचे नाव पुकारले गेले तेव्हा त्याने तहशीलदारांकडे दोन अर्ज देऊन 'अपील करावयाचे आहे व तारीख द्या' असे सांगितले. तेव्हा तहशीलदार एकदम त्याच्या अंगावर ओरडले व तारीख देणार नाही, मला आजच निकाल द्यावयाचा आहे, असे म्हणाले. नंतर या पोराला बसवा व दुसरा शहाणा माणूस बोलवा, असे त्यांनी आपल्या पट्टेवाल्यांना सांगितले. मग सावळ्या इकल्याचे नाव पुकारले गेले. त्यानेही वरीलप्रमाणे दोन अर्ज देऊन अपील करावयाचे आहे व तारीख द्या असेच सांगितले. तेव्हा मामलेदारांनी त्याचे अर्ज फेकून देऊन त्याचा जबाब घेण्यास सुरुवात केली व काही प्रश्न विचारले व त्यांची उत्तरे कागदावर लिहून घेऊ लागले. तेव्हा माझे वकील आल्याशिवाय माझा जबाब घेऊ नका अशी सावळ्याने विनंती केली. पण मामलेदारांनी ते न ऐकता तलाठ्यास त्याचा आंगठा घेण्यास सांगितले. तलाठी आंगठा घेऊ लागला तेव्हा सावळ्याने आपला हात सोडवून घेतला व सर्व आदिवासी कचेरी सोडून जाऊ लागले. तेव्हा मामलेदार-तहशीलदार ओरडले, की याला जाऊ देऊ नका. बाकीचे आदिवासी गेले. सावळ्याही बाहेर पडू लागला पण कोतवाल रामू वेढू पाटील व तहशीलदारांचा शिपाई यांनी आडवले. तहशीलदारांनी 'आंगठा दिला नाहीस तर जेलमध्ये बसशील' असा दम देऊन जबरदस्तीने त्याचा आंगठा घेतला. नंतर तहशीलदारांनी कोयनावाल्यांचे जबाब घेतले व आदिवासी गैरहजर राहिले म्हणून चौकशीचा एकतर्फी निर्णय देऊन ७।१२ च्या उताऱ्यात कोयनावाल्यांच्या नावांची नोंद करण्याचे हुकूम दिल्याचे दिसते. या सर्व घटनांसंबंधीची तक्रार आदिवासींनी त्याच दिवशी अर्ज करून

माननीय महसूल मंत्री व जिल्हाधिकारी यांचेकडे नोंदवली पण त्याची कोणी दखल घेतल्याचे दिसत नाही. उलट २५-१-७२ चे सुमारास तहशील कार्यालयामधून फेरफारीची कच्ची नोंद केल्याचे, पण त्याला अद्याप मंजुरी न मिळाल्याचे तसेच खरेदीचे व्यवहार कूळकायद्याचे कलम ४३ प्रमाणे बेकायदेशीर असल्याचे कळविण्यात आले.

या सर्व खटाटोपीनंतर आता ७।१२ चे उताऱ्याला कोयनावाल्यांची नावे पेन्सिलीने नोंदवली आहेत. पेन्सिलीची नोंद म्हणजे अंतिम नव्हे, पण असे असूनही बेकायदा खरेदीखते व दंडेलीची चौकशी यांच्या आधारे झालेल्या पेन्सिलीच्या नोंदीच्या जोरावर या जमिनीवर कोयनावाल्यांचा कबजा आहे असे मामलेदारांचे म्हणणे आहे. ता. २३ मे ७२ रोजी आम्ही सावळ्या इकल्या याची जमीन पेरण्यासाठी त्याच्याबरोबर गेलो असताना मामलेदारांनी ताबा सावळ्याचा नसून भोसले नावाच्या गृहस्थाचा आहे असे सांगितले. खरेदीपत्रे बेकायदेशीर असता तुम्ही भोसले यांचा ताबा आहे हे कसे म्हणता या माझ्या प्रश्नाला ते कोणतेही समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. भोसलेच्या जबाबाच्या आधारावर केलेली कच्ची नोंद हाच तहशीलदारांचा एकमेव आधार, पण भोसलेच्या जबाबावर सावळ्याचे म्हणणे ऐकूनच घेतले नाही, त्याला वकील देण्याची संधी दिली नाही, अपील करण्याची परवानगी नाकारली व दंडेलीने त्याचा जबाब घेऊन त्यावर दहशतीने त्याचा अंगठा उठवून घेतला. या सर्व घटना एखाद्या लोकशाही राज्यात व 'गरीबी हटाव'ची घोषणा देणाऱ्यांच्या अमदानीत चालतात.यावर कोणाचा विश्वास बसेल का? पण हे सत्य आहे. या राज्यांत आदिवासींना न्यायाने व माणुसकीने वागवले जात नाही व अधिकारी आणि पैसेवाले संगनमताने त्यांच्या जमिनी लुबाडतात याचे करंवेळी प्रकरण म्हणजे एक मर्तीमंत उदाहरण आहे.

**—बा. ना. राजहंस**



# कविता

## निदान

राखाडी रुग्णराऊळात जगाचे पंचप्राण
आशेच्या ऑक्सिजनचे श्वास घेऊन जगत आहेत.

अनादि कालापासून, कदाचित् अनंत कालापर्यंत–

शेवाळलेली शल्ये उराशी घेऊन
चिरणारे चीत्कार दडपत
हे जिणे कण्हत आहे: म्हणत आहे–

परिसाचा स्पर्श असून, सुवर्णाची बरसात नाही.
प्रतिभेचा झंकार असून, पत्थराला आकार नाही.
संतांचा रहिवास असून, वैकुंठाचा भास नाही.
चांदण्याचे गान असून, तृप्तीला उधाण नाही.

शेवाळलेली शल्ये घेऊन,
शस्त्रक्रियेला टाळीत,
भविष्याच्या शून्याला कवटाळीत,
चालला आहे जीवनाचा प्रवास आशेच्या
ऑक्सिजनवर–

–कारण माणसातला डॉक्टर आज स्वत:च–
आजारी आहे

मुकुंद इनामदार

## शपथ मला घालू नकोस

माझी देवावर प्रीती नाही–
देवाला हे सांगू नकोस.
माझी नीतीशी नाती नाहीत
लोकांना हे बोलू नकोस.
माझी माणसाची रीत नाही
माझे मलाच सांगू नकोस–
माझीच मला साथ नाही–
शपथ मला घालू नकोस

मुकुंद इनामदार

## मोजायला सांगू नकोस

तारे मोजायला सांगू नकोस
(माझं गणित कच्चं आहे)
आकाश ताऱ्यांनी खच्च आहे
चल, अजून कसला संशय
–हे सारं सच्चं आहे.

चंद्र आणायला सांगू नकोस
(मला दुसरा नकोच आहे !)
वाऱ्याविना कुणी नाही
तरी लाजाळूच आहे !

वीज धरायला सांगू नकोस
वेणीत तुझ्या गजरा आहे
असू दे रात्र कोवळी अजून
डोळ्यात तुझ्या कजरा आहे

शिरीष चिधडे

## आस्वाद


अनेकांनी पुन: पुन: सांगितलेले चिरपरिचित सत्यही नव्या परिभाषेचे वस्त्र लेववून मांडले की नवे वाटू लागते याचा प्रत्यय मुकुंद इनामदार यांच्या ' निदान '

ऱ्या कवितेत येतो. जग आशेवर जगत आहे, हे ते चिरपरिचित सत्य. जगावर रुग्णाइताचे आणि आशेवर ऑक्सिजनचे रूपक करणे ही नवीन परिभाषा. 'राखाडी रुग्णराउळ' ही नावीन्यपूर्ण प्रतिमा. शेवाळलेली शल्ये, चिरणारे चीत्कार, भविष्याचे शून्य या कल्पनात अर्थ व प्रास यांचे संवादी साहचर्य झालेले आहे. परिसाचा स्पर्श असून सुवर्णाची बरसात नसणे, प्रतिभेचा झंकार असून पत्थराला आकार नसणे, संतांचा रहिवास असून वैकुंठाचा भास नसणे वगैरे निवेदनातून विरोध-लयीचा झंकार केलेला आहे. कल्पना, भावना आणि वास्तवता हे या विरोधलयीचे प्रभावी घटक आहेत. माणसातला डॉक्टर स्वतःच आजारी असणे या कल्पनेशी मूळचे रूपक पूर्ण झाले आहे. कवीचे हे उत्प्रेक्षण त्याच्या नवीन परिभाषेशी सुसंगत आहे.

देव, नीती आणि माणसाची रीती यांच्याबाबतची स्वतःची वृत्ती 'शपथ मला घालू नकोस' या कवितेत मुकुंद इनामदार यांनी अगदी आत्मीयतेने सांगितली आहे. कवीचे हे हितगुज अतिशय सरळ असूनही व्यंजक आहे. मोजक्या शब्दात सांगितलेले असूनही बोलके आहे. देवावर प्रीती नसणे आणि नीतीशी नाती नसणे यामध्ये कुठलेही तर्ककर्कश तत्त्वज्ञान नाही. कविवृत्तीचा तो सहजस्वभाव आहे. म्हणूनच देवाला आणि लोकांना आपल्या अंतरंगाची ही मुरड कळू नये अशी विनवणी. सगळयावरचा आणि स्वतःवरचा अविश्वास इतक्या लाघवी रीतीने क्वचितच कुठे व्यक्त झाला असेल. कवितेला एक जिव्हाळयाचा ओलावा प्राप्त झाला आहे तो त्यामुळेच.

कच्चं-खच्च-सच्चं या प्रासावर्तनात शिरीष चिधडे यांच्या 'मोजायला सांगू नकोस' या कवितेची प्रेरणा असावी असे प्रारंभी वाटते, परंतु लागलीच त्यातील भावातुरता लक्षात येऊ लागते. या भावातुरतेला एक प्रकारची नवथर कोवळीक आहे. एकही नावीन्यपूर्ण प्रतिमान नसतानाही या कोवळिकीने या कवितेला माधुर्य प्राप्त करून दिले आहे. कवितेची रचना सूचकतेकडून स्पष्टतेकडे जाणारी आहे. प्रारंभी ताऱ्यांनी खच्च आकाश सच्चं असल्याचे आश्वासन विश्वासू वातावरणाची रमणीयता निर्माण करते. त्यानंतर चंद्र आणि लाजाळूपणाच्या सूचक उल्लेखातून सहवासमाधुरी प्रत्यय उलगडत जातो. आणि शेवटी वेणीतल्या गजऱ्यातील वीज आणि डोळयातल्या काजळाने कोवळी बनलेली रात्र यांच्या अनुभूतीतील उत्कटता स्पष्ट परिणाम साधून जाते.

—रसिक



# सुख आले माझ्या दारी....

भांडी धुता धुता सहज मी बेसिनवरच्या आरशात डोकावून पाह्यलं. रुक्ष भुरकट, केस, निस्तेज डोळे, ओठांची हट्टीपणानं एकमेकांना बसलेली दृढ मिठी, हं ! माझ्याकडे पाहून कुणीही ओळखू शकेल–प्रौढ कुमारिका ! माझ्या बाह्यरंगाप्रमाणे माझं अंतरंगही अलीकडे अगदी रुक्ष रुक्ष झालं होतं.

आज रविवार आणि आजच माझा पस्तिसावा वाढदिवस ! जीवनातले असेच अनेक रविवार गेले माझे. प्रत्येक रविवारी आम्ही सर्व भावंडं माझ्या घरी एकत्र जमतो व संध्याकाळी प्रत्येकजण आपल्या घरट्याकडे परत जातात.. आप्पा गेल्यावर संसाराची सर्व जबाबदारी माझ्यावरच पडली–मी सर्वांत मोठी म्हणून–इवल्याशा खांद्यांनी ती पेलली. सर्व भावंडांना नोकऱ्या लागल्या, बहिणींची लग्नं झाली–पण त्या खांद्यांना आधार द्यावा असं इतर भावंडांना कधी वाटलंच नाही. त्यांचे पाय जमिनीला टेकले तसे पख उभारून ते उडून गेले. पण ह्याचा दोष तरी

मी कुणाला देणार ? चुकले असेल तर ते माझेच !

मोलकरणीची रजा, त्यामुळे भांडयांवर मी तुटून पडले. भांडी पुरी पण झाली नव्हती, तेवढयात जयंती डोकावून म्हणते कशी, "जानीताई, जरा धरतेस या पोरींना, बाटल्या धुवून..."

"अग पण या दोन दोन वर्षांच्या जुळया बायांना दूधं बाटल्यांतून काय पाजतेस ?" मी विचारलं. त्यावर निष्काळजीपणानं जयंती उत्तरली, "मला बाई दूधच बरं वाटतं देणं ! एवढयात दूध सोडण्याची काय घाई आहे ?" मी मनात म्हटलं, "खरं आहे बाई तुझं ! नवरा म्हणजे हातातलं बाहुलं आहे तुझ्या ! तुला कशाला कुठल्या गोष्टीची घाई असणार ?" जरा वेळाने बंधुराज डोकावले आणि म्हणाले, "अग ताई, मी एक महिन्याची रजा घेतली आहे. बाहेरगावी जावं म्हणतो दोघं–पण मुलांच्या शाळा आहेत चालू ! तुझ्याकडे पाठवून देऊ का दोघांना ? तुला ऑफीसला जायला थोडा वेळ झाला तर चालत असेल ना ! ठरलं तर मग हं !" माझी संमती वा नकार, कशाचीच वाट न पहाता त्यानं चुटकीसारखा आपला Problem सोडवून टाकला–

तो गेल्यावर त्याच्या मागोमागच जगदीश आला–डब्यातले भाजलेले दाणे घेत

**सौ. मंदाकिनी**
**चिपळूणकर**

म्हणाला, "अग ताई, एकटी काय घासतेस भांडी. मी जस्मिनला मदतीला पाठवतो हं तुझ्या."

हं जस्मिनला पाठवतो म्हणे ! बायकोला पाठवायची काही याची टाप नाही–बडया घरची मुलगी केली आहे ना यानं ! ही सदा क्लब, नाटकं करत फिरत असते आणि जस्मिन बघते घरचं सगळं !

जस्मिनबाई आल्या त्या पाय आपटीत, धुसफुसतच. पण पोरच ती–आली लगेच खुषीत अन् नेहमीप्रमाणे तिच्या शब्दांची कबुतरं स्वैरपणे उडू लागली. "अय्या, आत्या, बाबा म्हणत होते, आज तू पस्तीस वर्षांची झालीस म्हणे ! मला वाटतं, म्हातारपण असंच चोरून लपतछपत येऊन माणसाला गाठत असलं पाहिजे. एक दिवस आपण सोळा वर्षांच्या असतो–जरा वेळानं बघतो तो काय ! झुम–आपला पस्तिसावा वाढदिवस डोळे वटारून आपल्याकडे बघतोय ! पण असं आयुष्यं एकटीनं

काढणं किती कटीण असेल नाही ? नो तारुण्य, नो पुरुषसहवास, नो प्रेम आणि अखेर म्हातारपण ! !" लिंबाची फोड चोखल्यावर शहारतं तसं तिचं अंग शहारलं.

अलीकडच्या मुलींच्या अफाट बोलण्याची मला सवय होती पण म्हणून घरातही मी हा अपमान सहन करू-मी तिला रागानं तटकन तोडून टाकलं—तशी ती घाबरून गप्प झाली—पण तेवढ्यात आमच्या जाईबाई आजूबाजूला घुटमळायला लागल्या— मी ओळखलं, तिला पत्ते खेळायला जायचं होतं ते. पण मी लक्षच दिलं नाही.

"जानीताई, झालं का ग तुझं ? या पोरांकडे बघतेस का जरा ? मी जाते पत्ते खेळायला." जाई एवढं म्हणते आहे तेवढ्यात माझं डोकं असं काही चक्रावलं, डोक्यात घणाघाती घाव पडू लागले, काम करणारे माझे हात सिमेंटात रुतल्यासारखे जागच्या जागी स्थिरावले, माझे हात स्थिरावले पण पायांना असा काही वेग आला, की बघता बघता रस्ता क्रॉस करून मी समोरच्या बागेत घुसून धावत सुटले. साडी तशीच वर खोचलेली, आडवा पदर कमरेशी घट्ट बांधलेला, केस वाऱ्यावर उडताहेत—तरी पण धावते आहे—सकाळी अंबाड्यात माळलेल्या फुलांच्या पाकळ्या वाऱ्यावर इतस्ततः विखुरल्या—माझ्या जीवनातील साऱ्या इच्छांप्रमाणेच— विचारांच्या भोवऱ्यात सापडले तशीच बागेच्या चक्रव्यूहात पण अडकले—समोरच्या आडव्या भिंतीशीच जाऊन धडकले...मनाशी म्हटलं, "माझं आयुष्य म्हणजेच अडथळ्यांची रेस झाली आहे म्हणा !" मी हे वाक्य बहुधा मोठ्यांदाच म्हटलं असावं, कारण कुणीतरी मला उत्तर दिलं, "असंच उजवीकडे प्रथम वळा आणि मग तीन-चार पायऱ्या खाली उतरा." यावर मी मूर्खासारखा प्रश्न केला, "आणि खाली उतरून जा कुठं ?" "अर्थातच तळ्यात उतरायचा मार्ग आहे तो. मला वाटतं, तुम्ही तिकडेच निघाला आहात ना ?" मी माझ्या तंद्रीतून जागं होत पाहिलं तो एक ४०–४५ वयाचा मनुष्य एका झाडाच्या सावलीत बाकावर विसावला होता. माझ्या एकंदर अवताराकडे बघत होता. मला काय वाटलं कुणास ठाऊक, मी चक्क त्याच्या शेजारी बैठक मारली आणि गंगा-जमुनांचा असा काही प्रवाह सुरू झाला. त्याच्या प्रेमळ आश्वासक परंतु वासनाविरहित स्पर्शानंदेखील तो ओघ काही केल्या थांबेचना ! छोटं मूल बापाच्या कुशीत कसं विश्वासानं विसावतं, तसा मी त्या बाहूंचा आधार घेतला.

"अरे, म्हणजे माझं चुकलंच म्हणायचं ! तुम्ही तळ्यात जात नसून लपायला एखादी जागा शोधत होता वाटतं ? स्वतःसाठी लपायला जागा शोधणं ही चांगली गोष्ट आहे. स्वतःसाठी जागा शोधणं जर आत्ताच तुम्हाला जमलं नाही तर मग ते आयुष्यात तुम्हाला कधीच जमणार नाही. स्वतःचा निवारा तुम्हाला गवसणार नाही." तो म्हणाला. मी चुळबुळ केली तशी त्यानं पटकन आपला हात काढून घेतला. मी परत विचारलं, "पण स्वतःचं घरटं कसं बांधायचं तेच मला कळत नाही !"

" हे सोपं आहे. पाठलाग करीत राहायचं. ध्येयाचा पाठपुरावा करीत राहायचं आणि उरल्या वेळात घरटं बांधायचं. घरटं म्हणजे तरी काय आपल्या मनाचा अंदाज घेणं. परिस्थितीचा अंदाज घेत आपण कोण आहोत, याचा शोध घेणं; मनाला सोयीस्कर कप्पे पाडणं हे पुढचं काम. ह्या कप्प्यात स्वतःचे षौक, हौशी, दुसऱ्या कप्प्यात प्रेम, द्वेष अशा भावना आणि या सर्वांतून आयुष्यभरची आनंद सुखाची शिदोरी भरून घ्यायची. मुख्यतः तुमच्या पसंतीच्या गोष्टींचा यात समावेश असला पाहिजे. फालतू गोष्टी नाही भरून ठेवायच्या यात, कळलं ?"

काही वेळ आम्ही दोघे स्तब्धच होतो. त्या शांततेच्या आधारावरच माझं बोलणं अधिक मोकळं झालं. हळूहळू माझं सारं जीवन मी त्याला ऐकवलं. 'मला वाटतं मी फार लाजरी भीत्री आहे – तरुणांशी बोलताना माझी जीभच टाळ्याला चिकटून बसत असे " मी समारोप केला.

" हं, म्हणजे मी म्हातारा वाटलो तर तुम्हाला " तो मिस्किलपणे म्हणाला. 'सॉरी हं ! तुम्ही काही म्हातारे नाही बरं का! तुमच्याशी मी एवढं बोलले याला दुसरंच काहीतरी कारण असावं असं मला सांगायचं आहे " मी

Thank you, Madam, मी नुकतीच चाळीशी ओलांडली आहे. "

खाली वाकून नाटकीपणानं कुर्निसात करीत तो म्हणाला. त्याचा चेहरा खूप आनंदी दिसत होता. तसं मी बोलून दाखवताच तो म्हणाला, " इतकेदिवस मी पत्नीबरोबर खूप आनंदात घालवले – पण तिची साथ सुटली आता – कुणीतरी सुखदुःखात सहभागी असलं तर आयुष्याला दुप्पट मजा येते – स्वतःच्या घरकुलाला दोन माणसांची जोड हवीच " आकाशातल्या जोडीनं जाणाऱ्या पक्ष्यांकडे पाहात मी नुसताच हुंकार दिला. मग सुस्कारा सोडीत म्हटलं " बरं आहे – घरटं माझं स्वतःचं असो वा नसो, मला परत घरी गेलंच पाहिजे, ते वाट बघत असतील, ओळख नसताना तुम्ही माझं सांत्वन ..."

" वा, वा मी येतोना सोबत ! आणि ते वाट पाहात असतील हे चूक आहे, खरं म्हणजे तुम्हालाच त्यांची सोबत सोडवत नाहीसं दिसतं आहे – तुम्ही आखून दिलेल्या मार्गानं ते जात आहेत " तो म्हणाला. घर काय समोरच होतं. पुढच्या व्हरांड्यात सर्वजण वाट पाहात उभे होते – आश्चर्यानि –

" बरीच मंडळी प्रतीक्षा करीत आहेत; खरंच त्यांना तुमची गरज असावीसं दिसत आहे. – बरं मी जाऊ आता ?" त्यानं परवानगी विचारली. कदाचित त्याच्या सहवासासंपर्कानं असेल, पण माझं लाजाळूपणाचं कवच आज गळून पडलं. ' वा, असं कसं, माझ्या स्वतःच्या कुणाच्यातरी बरोबर जाणं मला खूप आवडेल " आणि एवढं बोलताच मी खूपच लाजले–तत्परतेनं माझा हात पकडीत तो म्हणाला, अगदी हलकेच " म्हणजे तुम्हाला एकट्याला गवसलेला, दुसऱ्या कुणाचाही हक्क नसलेला माणूस, होना ? "

मी आश्चर्यानं वर बघत म्हटलं,

" अगदी माझ्या मनातलं कसं हो बोललात तुम्ही, कळत नाही ! "

' कळत नाही तुम्हाला ! कधीकधी स्त्री-पुरुष भेटतात, तेव्हा त्यांना काही एकमेकांना सांगावंच लागत नाही– " Simple chemical reaction "

खरंच काय देवाची करणी आहे ! अदृश्य पण दृढ अशा धाग्यांनी स्त्रीपुरुष बांधले जातात – पण असं माझ्या बाबतीत आजवर कधी घडतंच नव्हतं !

जगदीश पुढे झाला आणि त्यानं हात पुढे केला तेव्हा माझ्या एकदम लक्षात आलं की, ह्या माझ्या मित्राचं नावही मला माहीत नाही – पण तो सहजपणे पुढे होत म्हणाला " माझं नाव रामदास परांजपे – मी या गावी आलो की जुन्या मित्रमैत्रिणींना भेटी देतो –" जुन्या मैत्रिणींना ! म्हणजे आमची आत्ताच ओळख झाली आहे असं त्यांनी दाखवलं पण नाही – चातुर्यानं " वसाना, मी सर्वांची ओळख करून देतो – ही जयन्ती, ही जाई – आणि ही जस्मिन...

' अरे ही जस्मिन होय, मी पुष्कळ ऐकलं आहे जस्मिनच्या सुवासाबद्दल त्यांच्या



ह्या बोलण्यावर जस्मिन एकदम खूष होऊन गेली आणि चकीत पण – जगदीश परत म्हणाला, " बसा ना, काय घेणार ? चहा, कॉफी – अग ताई, चहा आण ना तुझ्या मित्रांना – बरं काय करता आपण ?" हो बसतो ना असं म्हणत त्यांनी माझा हात तसाच हाती धरून सोफ्यावर बसवलं व आपणही बसले – ते सांगू लागले " माझी बरीच जमीन होती, ती मी आत्ताच विकली, माझी पत्नी नुकतीच वारली व एक मुलगा आर्मीत आहे. विम्याचे पण बरेच पैसे आले–घरात अगदीच उदास वाटायला लागलं की येतो असाच जुन्या मित्रमैत्रिणींना शोधत, कसा आहे माझा प्रोग्रॅम " माझ्याकडे पाहून डोळे मिचकावीत ते मजेशीर हसले. जगदीशनं त्यांच्या आर्थिक परिस्थितीची अशी चौकशी करावी हे मला आवडलं नाही. पण या जगावेगळ्या माणसाला त्याचं काहीच वाटत नसावसं दिसलं – आपल्या जानी ताईचा भावी पती किंवा स्तुतीपाठक किंवा नुसताच मित्र याचा अंदाज जगदीशला घ्यायचा होतासं दिसलं.

' वरं आहे, आम्ही जाऊ ना आता सातच्या शोला ? मला वाटतं, तुमची हरकत नसावी ' आपल्यावरोवर मलाही उठवीत ते म्हणाले,

" अग मग माझे फ्रॉक अपुरे ! ..."

" आणि उरलेली भांडी कोण..."

अनेक आवाज एकदम गर्दी करू लागले आणि मी नेहमीप्रमाणेच भांबावले. पण त्यातच एक प्रेमळ आवाज म्हणत होता " जानकी, जा ग तू निवांत साडी वगैरे बदल पटकन – पुरुषांना कधी खोळंबत ठेवू नये बेटा, अजून कसं कळत नाही तुला. " आईचा असा दृढनिश्चयी आवाज किती दिवसात मी ऐकला नव्हता. मी चटकन् जाऊन आईच्या पायाला हात लावला तशी त्यांनी पण पुढे होऊन आईला नमस्कार केला. जस्मिननं तेवढ्यात माझी ठेवणीतली छान साडी आणून माझ्या हातात दिली अन् हसतहसत मला शेजारच्या खोलीत ढकलून ती एखाद्या नववधूसारखा माझा शृंगार करू लागली ...



# पुस्तके

# ॥ दर्या ॥

## शब्दांचा सामान्य फेस

**केशव मेश्राम**

श्री. विष्णू उर्फ बन्या साठे यांच्या बत्तीस कवितांचा मोठासा दिसणारा छोटा कवितासंग्रह, म्हणजे 'दर्या', वस्तूत: कवितेच्या प्रांतात मुशाफरी करण्यासाठी जी टोपणनावे निवडली जातात, ती गोड, गुलगुलीत वा लाडिक असतात. पण 'बन्या' हे असे एखाद्याचे घरगुती संबोधन काव्यनामासाठी वापरण्याचे श्रेय श्री. विष्णू साठे यांना द्यावे लागेल. आणि कधीकधी मासिक साप्ताहिकात झळकणारे हे नाव 'असे' असल्यामुळे खास करून लक्षात राहायचे.

'दर्या' या संग्रहातील बत्तीसही कविता वाचल्यावर पहिली जाणीव होते ती नवथरपणाची. अनुकरणाची. कविता ह्या वाङमय प्रकारावर कवीची भाबडी श्रद्धा असल्याचे पदोपदी जाणवते त्याचप्रमाणे हाताळण्यासाठीही काही खास परीश्रम लागतात असेही नाही असा श्री. साठे यांचा समज असावा असे वाटते. ह्या संग्रहात जे 'अनुकरण' आहे त्याबद्दलच थोडेसे सांगण्यासारखे आहे. दोनतीन अलिकडे गाजणाऱ्या कवींच्या शैलीचे, त्यांच्या लकबीचे तर येथे अनुकरण आहेच. पण त्याहीपेक्षा आजवर 'कविता' किंवा 'काव्य' ही कल्पना ज्या ज्या तऱ्हांनी भाबड्या मनात घर करून उरली आहे त्या सगळ्या प्रवृत्तींचा येथे एकोपा दिसतो. क्षितिज, चंद्र, सागरकिनारा, प्रेयसी, झुरणे, भान हरपणे, विव्हलता, वास्तवाने मीलनात घातलेला खो; या सगळ्यांसहीत वेचक नादमधुर शब्द, चाकोरीतली यमके, ठ ीव रंग, गंध, कलाटणी, आरंभ व अखेर या सगळ्यात ही अनुकरणप्रियता ओतप्रात दिसते.

भावनाचा अनावर असा ओघ यात नाही. प्रत्यक्षातली लसलसती ज्वालाही अभावानेच आढळते. शब्द मात्र असे एकत्र आले आहेत किंवा आणले आहेत की पद्य स्वरूपातली कचकड्याची दुबळी 'सांडउधळ' तेवढी खास करून लक्षात राहावी. अनावर उत्साहातून बांधलेली ही 'पूजा' कवीने कितीही कुणाचाही निर्वाळा दिला तरी अत्यंत सामान्य उतरली आहे. प्रकाशनाची अफाट हौस हेचं दर्याच्या सिद्धीचे कारण असावे. ह्या बत्तीसही कविता वाचनीय आहेत पण स्वतंत्र वाटत नाहीत. त्यातील फक्त दोन कविता मला मनाला पटणाऱ्या वाटल्या. क्रमांक 'दोन'ची कविता आरंभीच समाधान देते.

" काठ गाऱ्हाणे सांगता
तूहि सागर बनावे
त्याच्या अतृप्त डोळ्यात
तूही थोडेसे पाहावे "

ह्या ओळी सूचक व साध्या असल्यामुळे मनाला स्पर्श करून जातात. त्याचप्रमाणे क्रमांक 'आठ'चा अभंग—

" तुझ्या तालामध्ये
बेताल मी झालो
डोळ्यांनी वदलो
थांब जरा "

हाही चांगला वाटतो. ज्या दोन कवींचा श्री. साठे यांच्यावर मला प्रभाव जाणवतो. त्यातले एक आहेत श्री. नारायण सुर्वे. विशेषत: 'दर्या'तील कविता क्रमांक 'अठरा' 'एकोणीस' व 'पंचवीस' या वाचताना सुर्व्यांच्या संपूर्ण व्यक्तीत्वाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. त्याचप्रमाणे रंगछटांचा वापर करताना श्री. साठे दुसऱ्या कवीच्या प्रभावात अडकलेले दिसतात आणि ते म्हणजे 'रानातल्या कविता' कर्ते श्री. ना. धो. महानोर हे मराठवाड्यातील आणि आजच्या काळातील एक प्रभावी कवी. 'जांभळा रंग' ही महानोरांची खूप खूप आवडती अभिव्यक्ती. त्या रंगाचे त्यांना 'वेड' असावेसे त्यांच्या रानातल्या कवितातून आढळते. श्री. साठे यांनीही— 'प्रीत जांभळी डुलावी (दोन), अशा जांभळ्या रातीत (तीन)

सारं कस छान छान। जांभूळ पान
जांभळाच्या पानावर। घर तिचं लहान' (तेरा),

किंवा जांभळलेल्या या माळरानावर कुणाचा पदन्यास चालला आहे? (एकतीस) अशा कवितात त्या सदृश्य अभिव्यक्ती केली आहे.

पारंपरिक पद्धतीची विरहार्तता, यौवनासक्ती ही 'दर्या'तील कवितामध्ये दिसते, पण तिला दिशा नाही. 'दर्या'ला चित्र फार वेधक लाभले आहे. फक्त उजव्याच बाजूला कविता छापून डाव्या बाजूला पूर्ण कोरे पान सोडून संग्रह छापला आहे. पुस्तक उघडल्यावर श्री. न. म. जोशी यांची पत्ररूप प्रस्तावना आढळली. 'प्रेषित' या मला विशेष आवडलेल्या कादंबरीच्या एका चांगल्या लेखकाने (तेच हे श्री. जोशी असल्यास) प्रस्तावनेत भलावण केली म्हणून मोठ्या उत्साहाने व अपेक्षेने हा संग्रह मी वाचावयास घेतला. आता मगळेच वाङ्मय प्रकार झपाट्याने बदलातहेत. काव्यात तर इतके मूलगामी बदल होत आहेत की त्याचे निदान करणे, त्याबद्दल एखादे सूत्र शोधणे आव्हान ठरेल. अशा वेळी श्री. माठे यांनी आपल्या काव्यप्रेमाचे मन:पूर्वक परिष्करण करावे आणि आपल्या सच्चा सूर शोधणारी कविता लिहावी म्हणजे असा सामान्य शब्दांचा 'फेम' उदास करणार नाही. क्रमांक 'दोन आणि 'आठ'ची कविता त्यांच्या मनात डोकावण्यास भाग पाडते तेव्हा त्यांनी स्वत:च शोध घ्यावा हेच श्रेयस्कर. □

**दर्या** : विष्णू उर्फ बन्या माठे : विजयश्री प्रकाशन, पुणे ३० : किंमत चार रुपये


**तुमच्या मुलीचे लग्न ही काही बाहुला बाहुलीच्या लग्नाइतकी सोपी गोष्ट नाही...**



**पण आमच्या आवर्तक ठेव योजनेमुळे ती सोपी होते...**

तुमच्या मुलीच्या लग्नासाठी आवश्यक तेवढा पैसा आमच्या ह्या आवर्तक ठेव योजनेमुळं खात्रीनं उपलब्ध होतो दर महिन्याला ठराविक रकमेची बचत करा. तुमची बचत सतत वाढतच जाईल. आणि ज्या वेळी तो मंगल दिवस उगवेल त्यावेळी तुम्हाला जाणवेल आपण किती सुखी आहोत, पैशाची तर चिंताच नाही

दर महिन्याला बँकेत ठेवायची रक्कम रु. ५ किंवा त्याच्या पटीत
मुदत : १ ते १० वर्षे
व्याज : ७ टक्क्यांपर्यंत

अधिक तपशीलासाठी आमच्या कोणत्याही शाखेला भेट द्या

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

बंदुकीची एकही गोळी न झाडता १० मार्च १९५२ ला पहाटे दोन वाजता बाटीस्टाने प्रियो सोकारसला पदभ्रष्ट केले आणि स्वत: क्यूबाचा सर्वसत्ताधीश बनला. क्यूबन जनतेला ही राजवट नवी नव्हती. लोकशाही मार्गाला तर बाटीस्टाने धाब्यावर बसवले होतेच. पण कायद्याचाही मार्ग आता बंद झाला होता.

वकीलीचा काळा डगला फेकून देऊन फिडेल त्याच्या पुढच्या उद्योगाला लागला....

# फिडेल चे आणि क्रांती

लेखांक तीन

अरुण साधू

क्यूबाची राजधानी हॅवाना म्हणजे श्रीमंत परदेशी प्रवाशांचा विशेषत: अमेरिकनांचा स्वर्ग होता. ग्रामीण क्यूबा आणि हॅवाना यांच्यामध्ये फार मोठा फरक होता. अमेरिकनांच्या हातून सुटणाऱ्या पैश्यांच्या जोरावर हॅवानासारख्या शहरातील सर्व थराचे क्यूबन्स देखील चांगले राहू शकत होते. हॅवानामधील जीवन आणि ग्रामीण क्यूबातील जीवन यात खरोखरच भयानक तफावत होती.

अमेरिकन खेळ, अमेरिकन सिनेमे, नटनट्या यांची चटक हॅवानाला होती. जुगार खेळण्यासाठी अमेरिकन प्रवासी मुद्दाम हॅवानाच्या सुप्रसिद्ध कॅसिनोजमध्ये येत. हॅवानाच्या सुंदर समुद्र किनाऱ्यावर ऊन खात, लांबसडक मोटारींमधून हिंडत. क्यूबामधील श्रीमंत उद्योगपतींचाही असाच दिनक्रम, द्यूतगृहे, मोटारगाड्या, मद्य-मेजवान्या, नाच-गाणी.

खुद्द हॅवानामधल्या कामगारांची परिस्थिती मात्र अत्यंत हलाखीची असे. एकेका खोलीत चार चार कामगारांची कुटुंबे राहात. संडास नाही, नळ नाही, वीज नाही. शिवाय भाडे भरपूर. कंबरडे मोडणारे.

परंतु अत्यंत केविलवाणी स्थिती होती ती ग्रामीण क्यूबन जनतेची. नारळाच्या झाडांच्या पानांपासून तयार केलेल्या झोपड्यांमधून ते राहत आणि थंडी पावसाला कसे वसे तोंड देत. अमेरिकन साखर कंपन्या बाहेरून आणलेल्या कामगार कुटुंबांना राहण्यासाठी बराकी देत. या लांबचलांब बराकींमध्ये एकावर एक झोपण्याचे हॅमॉक्स असत. कुटुंबच्या कुटुंबे असे गुलामवत जिणे जगत. मुले-बाळे रोगराईने पिडलेली असत. बांडगुळांपासून होणारे भयानक रोग ग्रामीण क्यूबात फार मोठ्या प्रमाणावर पसरले होते. शिवाय ग्रामीण भागात वैद्यकीय मदत जवळ जवळ नव्हतीच. शाळा, रस्ते काही नव्हते. साखरकारखान्यांना आवश्यक तेवढेचाच बाबी येत. शिवाय वर्षातले फक्त पाच-सहा महिने काम. बाकी बेकारी.!

क्यूबात वर्ग दोनच. गरीब आणि श्रीमंत. मध्यम वर्ग फार कमी. राजकारणावर बहुतेक वरच्याच वर्गाचा पगडा होता. जहाल क्रांतीकारी देखील श्रीमंत वर्गाच्याच नव्या तरुण पिढीतून निर्माण होत. हॅवाना विद्यापीठात कास्ट्रोने आपल्याभोवती जे अनुयायी ओढले होते तेही बहुतेक सुखवस्तू घराण्यातून आले होते. पण क्रांतीसाठी सर्व तऱ्हेचा त्याग करण्याची त्यांची तयारी होती. बाटीस्टाच्या उठावानंतर मोंकाडा बराकींवरील धाडशी हल्ल्यासाठी फिडेलने असेच तरुण गोळा केले होते.

हिंसा हा त्या काळच्या लॅटिन अमेरिकन चळवळींचा आत्माच होता. त्यामुळे घटनात्मक लोकशाही आणि कायद्याचे असे सर्व मार्ग संपल्यावर आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या दिशेने पावले टाकणे हे फिडेलच्या दृष्टीने नैसर्गिकच होते.

## मृत्यूचे वेगळेच आकर्षण

आणि क्यूबात तर मानवी जीविताला क्षुद्र किंमत. त्यातल्या त्यात चांगल्या कारणासाठी मरणे हा तर महान सन्मान असे क्यूबात मानले जाते. जपानी लोकांप्रमाणेच क्यूबन लोकांनाही मृत्यूचे एक प्रकारचे वेगळे आकर्षण आहे. क्यूबन क्रांतीचा प्रणेता जोझे मार्टी याने म्हटले आहे, 'मृत्यूला कशासाठी घाबरायचे? मरणे म्हणजेच जगणे. मरणे म्हणजे नव्या रोपट्याला जन्म देणे. जो योग्य ठिकाणी आणि योग्य कारणासाठी मृत्यू पत्करतो तो अमर होतो.'

मार्टीच्या एका पुस्तकावर वाचताना मार्जिनमध्ये फिडेल कास्ट्रोने पेन्सिलने लिहून ठेवले आहे, 'अपमानित जीवन जगण्यापेक्षा बंदुकीच्या गोळ्यांच्या वर्षावात मरण आलेले मला पत्करेल.'

क्यूबाच्या राष्ट्रगीताचा पहिला चरणही मृत्यूचे गोडवे गाणारा आहे. 'पितृभूमीसाठी मरणे म्हणजे अमर होणे.' (आपण जसे आपल्या देशाला मातृभूमी म्हणतो त्या अर्थाने क्यूबन्स पितृभूमी म्हणतात.) क्यूबन क्रांतीची घोषणाही

अशीच ज्याच्या त्याच्या तोंडी घोळणारी पितृभूमी वा मृत्यू—

अशा घोषणांचे आणि गीतांचे क्यूबनांना एकदम आकर्षण आहे. एकोणीसाव्या शतकातील स्वातंत्र्ययुद्धामध्ये अक्षरशः हजारो क्यूबन तरुणांनी छातीवर हसत हसत गोळ्या झेलल्या. त्या अशीच गीते गात आणि घोषणा देत.

त्यामुळे मोंकाडासारख्या धाडसी योजनेत भाग घेऊन मृत्यूला तोंड देण्यासाठी फिडेल आणि त्याचे साथीदार सहज तयार झाले. एका साखर कारखान्यातील सुपरवायझर आबेल सान्तामारिया आणि एका अमेरिकन मोटार कंपनीत अकौंटंट म्हणून लठ्ठ पगार मिळविणारा जेसू मोन्ताने या दोघांनी एक गुप्त पत्रिका प्रसिद्ध केली होती. ते फिडेलला येऊन मिळाले. हळूहळू आणखी तरुण येऊन मिळू लागले. आणि मोंकाडाची योजना आकार घेऊ लागली.

मोंकाडाची तयारी चालू असतानाच फिडलने एक जाहीरनामा तयार केला, "मोंकाडाच्या क्रांतीकारकांचा देशासाठी जाहीरनामा." या जाहीरनाम्यातच त्याने आपल्या भावी कार्यक्रमाची बीजे सांगितली. हल्लाच फसल्याने या जाहीरनाम्याचा फारसा उपयोग झाला नाही.

मोंकाडावरील हल्ला फसला. हल्ल्यामध्ये भाग घेणारे अर्ध्याहून अधिक साथी ठार मारले गेले. उरलेले पकडले गेले. सांत्यागो शहरावर गुप्तपोलीसांचे सावट पसरले. सारे शहर भेदरून गेले. पोलीस कोणत्या क्षणी कोणत्या तरुणाला पकडतील आणि तुरुंगात डांबतील याला नियम नव्हता. पळालेल्या बंडखोरांना शोधण्यासाठी वाटेल त्या घरात घुसून पोलीस झडत्या घेण्याच्या निमित्ताने अत्याचार करीत. तुरुंगात डांबलेल्यांचे पोलीसांनी इतके भयानक हाल केले की, त्यांच्यापैकी काहींचे चेहरे ओळखू न येण्याइतके विद्रूप झाले.

## खटल्याला सुरुवात

मोंकाडा प्रकरणाचा बंदोबस्त करण्यासाठी बाटीस्टाने आपला खास दूत कर्नल शावियानो याला सात्यांगो येथे पाठविले होते. शावियानो याने सर्व बंडखोर गुन्हेगार असल्याचे जाहीर केले. त्याने असेही आरोप केले, की ऐन हल्ल्याच्या वेळी कास्ट्रोच्या अनुयायांना आपली चूक कळून आली आणि ते पळून जाऊ लागले, तेव्हा त्यांच्यावर कास्ट्रोने आणि त्याच्या साथीदारांनी गोळ्या झाडल्या. या आरोपांवर अर्थातच कुणाचा विश्वास बसणे शक्य नव्हते.

आरोपींमध्ये १२० तरुण आणि दोन स्त्रिया होत्या. फिडेलला एकट्याला वेगळ्या तुरुंगात ठेवले होते. आणखी काही आरोपी होते. पण त्यांचे चेहरे विद्रुप झाल्याने पोलीसांनी त्यांना खटल्यास आणलेच नाही.

सप्टेंबर २१, १९५३ रोजी खटल्याला प्रारंभ झाला. ज्या रस्त्याने तुरुंगातून कोर्टात आरोपींना नेण्यात येणार होते त्यावर एक हजार सैनिकांना बंदोबस्तासाठी ठेवले होते. सांत्यागोमध्ये आणि सर्व देशातच खटल्याविषयी कमालीची उत्सुकता आणि चिंता निर्माण झाली होती. सांत्यागो मधल्या तरुणांवर अत्याचार

झाल्यामुळे तर तथे खूपच धुमसते वातावरण निर्माण झाले होते.

खटल्याच्या सुरुवातीलाच सरकारी वकीलाने आरोप केला, की या हल्लयाला माजी अध्यक्ष प्रियो सोकारास याने आर्थिक पाठिंबा दिला होता. फिडेल स्वत: वकील असल्याने आपण स्वत:च केस चालविणार असे त्याने जाहीर केले होते. वरील आरोप ऐकताच त्याने खिशातून एक छोटी वही काढली आणि ती न्यायाधिशाला सादर केली. ती मध्ये हल्लयासाठी झालेल्या खर्चाचा तपशीलवार हिशेब होता. त्यासाठी लागलेले १६,४८० पेसो हे त्या बडखोरांनीच स्वत: जमविले होते.

प्रत्येक बाबतीत खटल्यामध्ये फिडेलने आक्रमक धोरण घेण्यास सुरुवात केली. बारीक-सारीक प्रश्न विचारून त्याने सरकारी वकिलाला भंडावून सोडले. तेव्हा सरकारी पक्षाच्या लक्षात आले, की फिडेलची वकीली सरकारला चांगलीच जड जाणार आहे. दोन दिवस केस तहकूब होती. तिसऱ्या दिवशी फिडेलला कोर्टात आणलेच नाही. पोलीसांनी जेव्हा सांगितले, की फिडेल आजारी असल्याने तो कोर्टात येऊ शकला नाही तेव्हा, आरोपी मेल्बा हरनांडिझ हिने आपल्या डोक्यावरचा घट्ट बांधलेला अंबाडा सोडला, त्यामधून एक कागद काढला आणि न्यायाधीशाला सादर केला. फिडेलच्याच हस्ताक्षरातील ती चिठ्ठी होती.

आपण पूर्णपणे निरोगी असून आपल्याला काही झालेले नाही असे फिडेलने चिठ्ठीत लिहिले होते. सरकार आपल्याला ठार मारण्याचा कट करीत आहे म्हणून आपल्या आजारपणाबद्दल सांगितले जात आहे. कोर्टाने कुणाला तरी पाठवून आपल्या 'आजारा'ची चौकशी करावी अशी विनंती त्याने केली, त्याच प्रमाणे कोर्टाने स्वत:च्या प्रतिनिधींकरवी कैद्यांना तुरुंगातून कोर्टात आणताना देखरेख ठेवावी, म्हणजे कोणी 'पळून जाण्याचा प्रयत्न करताना' त्याला ठार मारण्याचे निमित्त पोलीसांना मिळणार नाही.

कोर्टाने हा अर्ज स्वीकारला आणि फिडेलच्या प्रकृतीवरील वैद्यकीय अहवाल सादर करण्याचा सरकारला हुकूम सोडला.

वस्तुस्थिती ही होती, की या खटल्याला क्यूबामध्ये आणि अमेरिकेत भलतीच प्रसिद्धी मिळत होती आणि फिडेल त्या खटल्यात असणे सरकारला गैरसोयीचे वाटत होते.

कोर्टाने पाठविलेल्या दोन डॉक्टर्सनी फिडेलला तपासून त्याची प्रकृती चांगली असल्याचा निर्वाळा दिला. तरी त्याला खुल्या कोर्टात पुढे कधीच आणले नाही. उलट मेल्बा हरनांडिझ फिडेलची चिठ्ठी मिळवून तुरुंगाबाहेर कशी नेऊ शकली याची चौकशी सुरू झाली. कोर्टात जाताना प्रत्येक कैद्याची संपूर्ण झडती घेतली जाऊ लागली. फिडेलला त्या तुरुंगातून हलवून दुसरीकडे नेण्यात आले आणि सुमारे वीस दिवसानंतर त्यासाठी दुसरीकडेच नर्सेसच्या एका होस्टेलमध्ये गुप्त खटल्याची व्यवस्था करण्यात आली.

इकडे मूळ खटल्याला थोडी फार प्रसिद्धी मिळू शकत होती. पण त्यावर बाटीस्टाचे वृत्तपत्रीय निबंध होते. खटल्यात साक्ष देताना हेडी सांतामारिया हिने पोलिसी अत्याचाराची एक भयंकर गोष्ट सांगितली. डॉ. मुनोझ आणि इतर पंचवीस बंडखोरांना पोलिसांनी ठार मारले; हे तिने सांगितले. हेडीचा भाऊ आबेल हाही तुरुंगात होता. एके दिवशी पोलीस तिच्या कोठडीशी आले. एकाने एका कागदाच्या गुंडाळीतून एक मानवी डोळा काढून तिला दाखविला आणि सांगितले की तो तिच्या भावाचा आहे. प्रियो सोकारास या हल्ल्याच्या मागे होता अशी कोर्टात कबुली देण्याचे तिने लिहून दिले नाही, तर दुसराही डोळा आणू अशी धमकीही पोलिसांनी दिली. तिने जेव्हा नकार दिला तेव्हा थोडयाच वेळात आबेलचा दुसराही डोळा तिच्यासमोर येऊन पडला. कैद्यांना असे हाल हाल करून ठार मारीत.

## ऐतिहासिक भाषण

फिडेलवरील खटल्याच्या बाबतीत संपूर्ण गुप्तता बाळगण्यात आली होती. खटल्याच्या खोलीत तीन न्यायाधीश, दोन वकील, कित्येक सशस्त्र सैनिक आणि सहा निवडक वार्ताहर याशिवाय कुणालाही प्रवेश नव्हता. उपहासाची गोष्ट अशी की वार्ताहरांना खटल्याचा एकही शब्द प्रसिद्ध करण्याची परवानगी नव्हती.

अशा या निराशामय परिस्थितीतून फिडेल कास्ट्रोने प्रचाराचा एक जोरदार दणका हाणला. आपल्या बचावाचे त्याने जे उत्कृष्ट पाच तासाचे भाषण केले ते त्याने पुढे प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करून ठेवली होती. आपल्याला मृत्युदंड होईल याची त्याला खात्री होती. पण आपली बाजू देशापुढे येऊन क्रांतिकार्य पुढे चालूच रहावे अशी त्याची इच्छा होती. कास्ट्रोने नेहमीच्या पद्धतीने भाषण करून सबंध कोर्टाला ग्रुंगवून टाकले. भाषणाच्या शेवटचे वाक्य होते, 'मला दोषी ठरवून ठार करा. त्याने काहीच बिघडणार नाही. इतिहास मला दोषमुक्त करील!' (Condemn me. It does not matter. History will absolve me)

त्याच्या या भाषणातूनच हिस्टरी विल अबसौल्व मी, 'इतिहास मला दोषमुक्त करील.' या ऐतिहासिक पुस्तकाचा जन्म झाला.

फिडेलच्या बचावाचे मुख्य सूत्र हे होते की बाटीस्टाने घटनेला धाब्यावर बसविल्यामुळे घटनात्मक सरकार उलथून पाडण्याचा आरोप त्याच्यावर करताच येत नाही. बाटीस्टा सरकारच्या घटनात्मक वैधतेला त्याने आधीच कोर्टात आव्हान दिले होते; पण कोर्टाने त्याचा अर्ज फेटाळून लावला होता हेही त्याने सांगितले.

याच भाषणांत त्याने भविष्यकाळातील क्यूबाविषयीचे आपले विचार सांगितले. त्यातच त्याच्या क्रांतिकारी विचारांचे सूत्र दिसून येते. मोंकाडासाठी त्याने जो जाहीरनामा तयार केला होता, त्याचेच विस्तृत विवेचन म्हणजे हे भाषण.

हॉस्पिटलमधील नर्सेस हॉस्टेलच्या भागात हा खटला चालू होता. फिडेलने जेव्हा भाषणास सुरुवात केली तेव्हा हॉस्पिटलचा स्टाफ आणि कोर्टातील सशस्त्र

सैनिक केवळ कुतूहल म्हणून ऐकू लागले. पुढे त्याच्या भाषणात जेव्हा रंग भरू लागला तेव्हा चांगले ऐकू यावे म्हणून लोक गर्दी करू लागले. सैनिक देखील ज्या ठिकाणाहून चांगले ऐकू येईल अशा जागा आळीपाळीने बदलू लागले.

कास्ट्रोने सांगितले की केवळ दहा सशस्त्र माणसांनिशी तो सांत्यागो चे रेडिओ स्टेशन ताब्यात घेऊ शकला असता. त्याच्याजवळ छिबारूचे एक टेप केलेले भाषण होते. ते रेडिओवर लावल्यास सबंध सांत्यागो शहर पेटवून उठविण्यास पुरेसे होते. पण तसे केले असते तर सैनिक बराकीतून बाहेर पडले असते आणि बेसुमार रक्तपात झाला असता. हजारोंच्या संख्येने नागरिक मेले असते. म्हणून प्रथम बराकी ताब्यात घ्यायच्या आणि मग रेडिओ स्टेशन घ्यायचे असा त्यांचा इरादा होता. मधल्या अनपेक्षित गोष्टी घडल्या नसत्या तर त्याला यशाची खात्री होती.

'प्रचार असा केला जातो की आधुनिक शस्त्रांच्या उपलब्धतेमुळे जुलूमशाही आणि हुकूमशाही यांच्याविरुद्ध सामान्य जनता टक्कर देण्यासाठी उभी राहू शकत नाही. हे खरे नाही. लोकांनी अन्यायाविरुद्ध झगडण्याचे मनावर घेतले तर जगातील कोणतीही शक्ती, कोणतेही शस्त्र त्यांना नमवू शकत नाही–'

स्वत: कास्ट्रोनेच हे पुढे सिद्ध करून दाखविले.

याच भाषणात १९४० च्या घटनेवरील आपली श्रद्धा व्यक्त केली. पुढे कास्ट्रोने शब्द फिरविले, १९४० ची घटना अंमलात आणली नाही वगैरे आरोप त्याच्या शत्रूंनी आणि अमेरिकनांनी केले. पण वस्तुस्थिती अशी आहे की क्यूबाच्या १९४० च्या घटनेसारखे भोंगळ आणि गोंधळाचे पुस्तक दुसरे नसेल. त्या घटनेखालीच पुढे १९५५ पर्यंत क्यूबात भ्रष्टाचार आणि बजबजपुरी माजली होती. परंतु एवढे मात्र खरे की स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचे प्रतीक म्हणून ती घटना त्या वेळच्या क्यूबन लोकांपुढे होती. परंतु प्रचलित आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यास ती घटना अपुरी आणि नालायक ठरली होती हे उघड आहे.

फिडेलचा खटला संपण्याच्या आधीच मूळचा खटला संपलाही होता. बंडखोरांना खरे म्हणजे मृत्युदंडाचीच सजा होणार होती. सरकारचा तसा प्रयत्न होता. पण सांत्यागो पोलीसांच्या अत्याचारामुळे सबंध क्यूबाभर भयंकर प्रक्षोभ निर्माण झाला होता. त्यामुळे त्यांच्यावर विविध वर्षांच्या सजा ठोकण्यात आल्या.

आपल्या बचावात आपणाला मुक्त करावे अशी मागणी फिडेलने केली नाही. तो म्हणाला, 'माझे साथी तुरुंगात खितपत पडले असताना मला मुक्त करा अशी मागणी मी करू शकत नाही. त्यांना जाऊन मिळण्यासाठी मलाही तिकडेच पाठवा. ज्या राज्याचा अध्यक्ष एक गुन्हेगार आणि चोर आहे त्या राज्यात प्रामाणिक, आणि सन्माननीय नागरिकांना मृत्यू किंवा तुरुंगवासाची शिक्षा मिळावी हे अपेक्षितच आहे. ..मला माहीत आहे; तुरुंगात आम्हाला अनेक अत्याचार सहन करावे

लागतील. परंतु मला त्याचा धाक नाही. ज्या जुलूमी हुकूमशहाने माझ्या सत्तर बांधवांचे वळी घेतले त्याचीही भीती मला वाटत नाही–' ' शेवटी तो स्वर उंच नेऊन ओरडला, ' मला दोषी ठरवा, ठार मारा. फिकीर नाही. इतिहास मला दोषमुक्त करील. '

कोर्टात तर त्याने हे भाषण केलेच. पण पुढे तो तुरुंगात असतानाच त्याचे हे जहाल भाषण गुप्तपणे छापून वाटण्यात आले. त्याचे तुरुंगात आपल्यावर काय परिणाम होतील याची त्याला फिकीर नव्हती. बाटीस्टानेही फिडेल आता खलास झाला म्हणून त्याकडे लक्ष दिले नसावे.

फिडेलला १५ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. आणि इतर बंडखोर कैद्यांना जिथे ठेवले होते त्या पाईन द्वीपावरील तुरुंगात त्याला ठेवले. प्रमुख क्यूबन द्वीपाच्या आग्नेयेला असणारे हे छोटेसे बेट म्हणजे रॉबर्ट लुई स्टीव्हनसनचे सुप्रसिद्ध ' ट्रेझर आयलँड. '

फुल्जिन्शो बाटीस्टा आणि फिडेल कास्ट्रो यांच्यातील लढाईची पहिली फेरी अशा रीतीने बाटीस्टाने जिंकली,

## अनुयायांची असीम निष्ठा !

पण फिडेलचे वैशिष्टच हे की पराभवाच्या आणि निराशेच्या काळातही त्याने आत्मविश्वास गमावला नाही. आणि आपल्या अनुयायांची श्रद्धा कायम राखली. माणसे मोठी का असतात याची कारणे अनेक असतील. पण फिडेलचे महाचुंबकीय व्यक्तिमत्त्व विलक्षण होते. त्याची अफाट बुद्धी, असामान्य धैर्य, आकर्षक शरीरयष्टी आणि गुंगवून टाकणारे व्यक्तिमत्व यामुळे तर तरुण त्याच्याकडे आकर्षित होतच. पण अत्यंत निराशेच्या काळातही आपल्या आदर्शांवरील त्याची श्रद्धा आणि ध्येय गाठूच, हा आत्मविश्वास पाहिला की त्याचे अनुयायी त्याच्यापुढे पूर्णपणे लीन होतात. फिडेलवरील त्यांची निष्ठा एकदम संपूर्ण असते. विशेषत: मोंकाडा आणि पुढच्या गनिमी लढ्याच्या काळात जे फिडेलच्या बरोबर होते ते सतत त्याला संपूर्ण निष्ठेने साथ देत आले आहेत.

मोंकाडा प्रकरणी जेव्हा फिडेलला पकडले तेव्हा त्याला प्रथम अलग ठेवले होते. त्यामुळे सर्वांना त्याच्या जीविताविषयी भयंकर चिंता लागून राहिली होती. कारण सर्वांची श्रद्धा होती की फिडेल जिवंत राहिला तर क्रांती चळवळही पुढे जिवंतच राहील आणि विजयी होईल.

बंडखोरांच्या फिडेलवरील निष्ठेचे मोठे हृद्य चित्र हेडी सांतामारिया हिने एका ठिकाणी रेखाटले आहे. मोंकाडा हल्ल्यानंतर हेडी, तिचा भाऊ डॉ. आबेल आणि इतर काही बंडखोर तेथील हॉस्पिटलमधे अडकले होते. केव्हाही सैनिक येऊन गोळ्या झाडतील याची सर्वांना खात्री होती. पण जो तो विचारत होता, फिडेल कुठे आहे ? फिडेल सापडता कामा नये. आबेल हेडीला म्हणाला, ' होय ते इथे

आपल्याला ठार मारतील यात शंका नाही. पण फिडेलला मारू देता कामा नये. छे: मी फिडेंलबरोबरच रहायला हवे होते. त्याच्याबरोबर कोण कोण आहे? फिडेलला मरू देता कामा नये हे त्यांना कळेल ना?'

पुढे त्यांना तुरुंगात ठेवले. तेव्हाही फिडेलचे काय झाले हे कुणालाच कळेना. आबेलला ठार मारल्याचे कळले. पण ते आम्ही सहन केले. जेव्हा फिडेल आम्हाला प्रथम दिसला (तुरुंगात) तेव्हा आम्हाला रडे कोसळले; आनंदाने.

फिडेलची सर्वांशी तुरुंगात गाठ पडल्यावर त्याने हेडीला विचारले, आबेल कुठे आहे? हेडी अगदी सहजपणे म्हणाली, 'आबेलला ठार मारलं.' ती हे एवढ्या सहजपणे म्हणाली की जणू आबेल आपल्या शेजारी उभा आहे.

फिडेलने एकदम मान खाली घातली. आणि तो गप्प उभा राहिला. तेव्हा हेडीच म्हणाली, 'फारसं वाटून घेऊ नकोस. तू जिवंत आहेस म्हणजे आबेलच जिवंत आहे.'

हेडी सांगते, 'हे सगळं खरं खरं घडलं आहे. मला फारसा तपशील आठवत नाही. पण तेव्हापासून माझ्या डोक्यात विचार असायचा फक्त फिडेलचा. आमच्या-पैकी प्रत्येकाचे एकच आशास्थान आणि दैवत होते–फिडेल. फिडेल, ज्याला मरू देता कामा नये; फिडेल, ज्याने क्रांती पुढे नेण्यासाठी जिवंतच राहिले पाहिजे. फिडेल, ज्याचे जीवन म्हणजे आम्हा सर्वांचे जीवन होते. जोवर फिडेल जिवंत आहे तोवर आबेल, माझा प्रियकर बोरीस आणि इतर सारे फिडेलच्या रूपाने जिवंतच आहेत. आणि फिडेल, जो क्रांती यशस्वी करणार आहे आणि क्यूबन लोकांचे भविष्य उज्वल करणार आहे.'

अशी असाधारण निष्ठा फिडेलच्या अनुयायांची त्याच्यावर होती. एवढे भाग्य फारच थोड्या नेत्यांना मिळते. अर्थात याचे श्रेय फिडेललाही आहे. कोणत्याही धोक्याच्या क्षणी फिडेल मागे कधीच राहिला नाही. आपल्या अनुयायांच्या विनवण्यांना आणि भीतीला न जुमानता कैक लढायांमध्ये हाती मशीनगन घेऊन आघाडीवर राहिला. तो ठार झाला नाही हे त्याच्या अनुयायांचे नशीब. अशा गोष्टीच अनुयायांची श्रद्धा आणि निष्ठा संपादन करतात.

खटल्याच्या आधी फिडेलला अन्नातून विष देण्याचा तुरुंगात प्रयत्नही करण्यात आला होता. परंतु तुरुंगाचा लष्करी निरीक्षक फिडेलचा चाहता होता. म्हणून फिडेल वाचला.

पाईन बेटावरील तुरुंगात आपल्या इतर साथीदारांबरोबर येताच त्याने त्या तुरुंगाची एक शाळाच करून टाकली. बौद्धिके घेणाऱ्यांमध्ये तो एकटाच. 'आबेल सांतामारिया अकादमी' असे त्या शाळेचे नामकरणही त्याने करून टाकले. हा तुरुंग अभेद्य आहे. त्यामुळे आत कैद्यांना वावरण्यास बरीच मोकळीक मिळे. क्रांतीचे महत्व आणि क्रांती करण्याचे मार्ग याविषयी फिडेल स्वतःही विचार करी आणि

आपल्या सोबत्यांना आणि इतर कैद्यांना समजावून सांगे. तुरुंगातले सगळेच कैदी काही फिडेलचे साथीदार नव्हते. इतर तऱ्हेचेही कैदी होतेच. फिडेल सर्वांना क्रांतीच्या मद्याचे घोट पाजीत होता. त्याच्या भाषणांमुळे कैद्यांमध्ये एवढी भयानक अस्वस्थता निर्माण झाली की तुरुंगाधिकाऱ्यांनी शेवटी फिडेलला वेगळे काढून एका वेगळ्या अंधार कोठडीत डांबून ठेवले.

याच तुरुंगातून फिडेलने विविध मार्गाने 'हिस्टरी विल अबसॉल्व मी' या पुस्तकाचा मजकूर चोरून बाहेर पाठविला. कोऱ्या कागदावर लिंबाच्या रसाने लिहून ते कागदाचे चिटोरे तो बाहेर पाठवू लागला. नंतर मित्रांना सरळ बाळबोध पत्रे पाठवून त्यांच्या दोन ओळीमध्ये लिंबाच्या रसानी लिहू लागला. लिंबाचा रस म्हणजेच अदृश्य शाई. गरम इस्त्री त्या कागदांवर ठेवली की अक्षरे लगेच स्पष्ट दिसू लागत. शेवटी जेव्हा पूर्ण मजकूर आला तेव्हा तो रातोरात छापून काढण्यात आला. आणि ती पत्रिका संबंध क्यूबाभर गुप्तपणे वाटण्यात आली.

त्या पुस्तिकेचा त्यावेळी फारसा परिणाम झाला नाही. पण पुढे जेव्हा फिडेलचे गनीमी युद्ध ऐन जोरात आले होते तेव्हा फिडेलने ही पुस्तिका पुन्हा मोठ्या प्रमाणावर छापून वाटली. त्यावेळी मात्र या पुस्तिकेने सबंध क्यूबात प्रचंड खळबळ माजली. आणि एकदम तिला मानमान्यता मिळाली. त्यावेळी या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे फिडेलने लोकप्रियतेचे शिखर गाठले. फिडेल त्यावेळी सिएरा मेस्त्राच्या पहाडी प्रदेशात बाटीस्टाच्या फौजांशी प्रत्यक्ष लढाई करण्यात, गुंतला होता. त्यामुळे तर या पुस्तिकेला भलतीच रोमँटिक लोकप्रियता लाभली.

तुरुंगात असताना फिडेलने जबरदस्त वाचन केले. फिडेलचे वाचन आधीच प्रचंड, तुरुंगात ते त्याने अधिकच वाढविले. वाचनाचे विषय होते अर्थातच इतिहास आणि राजकारण. याचवेळी त्याने मार्क्स आणि लेनिनचेही थोडेसे लिखाण वाचले. या वाचनातूनच क्रांतीच्या कल्पना अधिक वास्तव आकार घेऊ लागल्या.

इकडे सर्व बंडखोरांना पाईन बेटावरील तुरुंगात टाकल्याच्या समाधानाचा निश्वास बाटीस्टाने टाकला. बंडखोरांना आपण दडपून टाकले याची त्याला खात्री वाटली. नाही तरी खटला चालू असताना देखील बाटीस्टाने त्यांची फारशी फिकीर केली नव्हती. मूठभर माथेफिरू यापलीकडे बाटीस्टा त्यांना फारशी किंमत देत नव्हता. त्याला त्यांची ताकदच फारशी कळली नव्हती. तेव्हा एकदा त्यांना तुरुंगात टाकल्यावर बाटीस्टाने वृत्तपत्र स्वातंत्र्यावरील बंधने काही प्रमाणात उठविली.

त्यानंतर उशीराने का होईना पण मोंकाडावरील फिडेल कास्ट्रोच्या नाट्यमय धाडसी हल्ल्याचे वृत्तांत हळू हळू क्यूबन वृत्तपत्रांतून येऊ लागले. खटल्याचे देखील त्रोटक वृत्तांत येऊ लागले. तेव्हा कुठे क्यूबन जनतेला मोंकाडावर फिडेलने का आणि कसा हल्ला केला याची कारणे कळू लागली. खटल्याच्या दरम्यान सुरुवातीला

कास्ट्रोने पोलीस आणि लष्कर यांच्यावर जे आरोप केले होते तेही जनतेला कळू लागले.

परंतु या गोष्टीला क्यूबन वृत्तपत्रांनी फारसे महत्त्व दिले नाही. पोलीसांनी बंडखोरांवर केलेले 'अत्याचार, त्यांचे केलेले खून आणि कास्ट्रोने खुद्द बाटीस्टावर केलेले आरोप यांना वृत्तपत्रात फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. कारण एक तर वृत्तपत्रे बाटीस्टाला घाबरत होती, आणि मुख्य म्हणजे बऱ्याच वृत्तपत्रांच्या मालकांना दर महिन्याला नियमितपणे बाटीस्टाच्या कचेरीतून नोटांनी भरलेले लठ्ठ पाकीट मिळे ! यात लपवाछपवी नव्हती.

मोंकाडा वरील २६ जुलै १९५३ च्या चढाईच्या कथा लोकांमध्ये प्रथमच पसरत असतानाच, बाटीस्टाने नोव्हेंबर १, १९५४ रोजी अध्यक्षपदाच्या निवडणुका घेण्याचे जाहीर केले. व स्वत:ची उमेदवारीही जाहीर करून टाकली.

या निवडणुकींच्या प्रामाणिकपणावर लोकांचा विश्वास नव्हताच. मोंकाडा प्रकरणामुळे बाटीस्टाविषयीचा तिरस्कार लोकात वाढत होता. त्यामुळे निवडणुकी म्हणजे नुसते नाटक असणार याची लोकांना खात्री होती. तरी देखील उपचार म्हणून ग्राव सान मार्टीन हा विरोधी उमेदवार म्हणून निवडणुकीस उभा राहिला. उपहासाची गोष्ट अशी की ग्रावचा निवडणुकीचा खर्च स्वत: बाटीस्टाच चालवीत होता. आपण घटनात्मकरीत्या निवडून आलो, हे दाखविण्यासाठी त्याला कोणी विरोधी उमेदवार हवा होताच. पण ग्रावचीच जेव्हा खात्री झाली की कोणत्याही परिस्थितीत न्यायाने निवडणुका होणार नाहीत, तेव्हा त्याने माघार घेतली. बाटीस्टा पुन्हा निवडून आला.

बाटीस्टाचे अध्यक्षपद आता घटनात्मक रीतीने चार वर्षांसाठी कायम होताच राजकीय कैद्यांना माफी देण्याची मागणी क्यूबात सर्वत्र सुरू झाली. पण बाटीस्टाने तिकडे लक्ष दिले नाही. संसदेमध्ये देखील वारंवार ही मागणी होऊ लागली. एकदा संसदेने असा ठराव केल्यावर मात्र बाटीस्टाने मान तुकविली आणि १३ मे १९५५ रोजी फिडेलला आणि त्याच्या साथीदारांना माफी दिल्याची घोषणा केली.

दोन दिवसांनी पाईन बेटावरील तुरुंगातून त्यांची सुटका झाली तेव्हा त्यांचे तेथील रहिवाशांनी जोरदार स्वागत केले. हॅवानातही त्यांचे स्वागत झाले. हा वेळपर्यंत फिडेल कास्ट्रो चांगलाच प्रसिद्धी पावला होता. परंतु तरीही त्याला अजून क्यूबन जनता एक भडक माथ्याचा देशभक्त अशाच नजरेने पाहत होती. त्याचे क्रांतीकारी स्वरूप अजून क्यूबाला समजले नव्हते. बाटीस्टा तर फिडेलकडे एक क्षुद्र त्रासदायक माथेफिरू म्हणूनच बघत होता, आपल्या पोलादी राजवटीला धडक देण्याची ताकद या टोळक्यात आहे असे त्याला तेव्हा स्वप्नातही वाटत नसणार. त्याशिवाय त्याने फिडेलला माफी दिली नसती.

परंतु माफी मिळून सुटका झाली आणि जीव वाचला म्हणून स्वस्थ बसण्याचा

फिडेलचा स्वभाव नव्हता. पाईन बेटावरून हॅवानाकडे येताना बोटीतच आपल्या चळवळीला नाव काय द्यायचे याची चर्चा झाली. मोंकाडा चळवळ किंवा सव्वीस जुलै चळवळ अशा दोन नावावर चर्चा झाली शेवटी दुसऱ्या नावाच्या बाजूने सर्वांचे मत पडले. आणि सव्वीस जुलै हे शब्द आणि तो दिवस क्यूबन भावनांशी कायमचे निगडित झाले. आज बेचाळीसचा लढा या शब्दांनी भारतात ज्या भावना जागृत होतात; त्यापेक्षा कितीतरी तीव्र पटीने भावना आणि स्मृती सव्वीस जुलै या शब्दांनी क्यूबात जागृत होतात.

## निकराचा लढा

बोटीतल्या चर्चेतच फिडेलने सांगितले की शांततामय आणि लोकशाही मार्गाने क्यूबाची परिस्थिती सुधारणे अशक्य आहे; हे जरी खरे असले तरी ते अजून लोकांना पटलेले नाही. त्यामुळे आपल्या कृतीने ही गोष्ट आपण लोकांच्या गळी उतरविली पाहिजे.

हॅवानाला येताच फिडेलने पुन्हा एक जाहीरनामा काढला : "आम्ही सुटलो खरे. पण आता विश्रांती नाही. आता पुन्हा कर्तव्य, झगडा. सुटकेच्या पहिल्या दिवसापासून देशाला, भ्रष्टाचार, दुःख आणि दारिद्र्य यापासून मुक्त करण्यासाठी निकराचा लढा, हेच आमचे कर्तव्य. आपल्या देशाचा उज्वल भविष्यकाळ आता कोणी बदलू शकणार नाही."

काही मोजके लोक सोडल्यास या जाहीरनाम्याची कोणी फारशी दखल घेतली नाही.

आपली चळवळ आणि ओर्टोडोक्सो पक्ष यांचे संबंधही कास्ट्रोने तोडून टाकले; आणि सव्वीस जुलै चळवळ ही गरिबांची, गरिबासाठी आणि गरिबांनी चालविलेली संघटना आहे असेही त्याने जाहीर करून देशातील सर्व क्रांतिकारकांना चळवळीत सामील होण्याचे आवाहन केले.

चळवळीचा कार्यक्रम संदिग्धच होता. चळवळ जसजशी पुढे जाईल तसतसा घटनांमधून कार्यक्रम निश्चित होईल असे फिडेलचे मत होते. अगोदरच कार्यक्रमाची चौकट लावून घेतली तर चळवळीची गतिमानता नाहीशी होईल असे त्याला वाटत होते.

हॅवानात परतल्यावर कास्ट्रोने राजकीय अहिंसक चळवळींची सर्व दारे ठोठावून बघितली. पण त्याच्यासाठी सर्वच दारे बंद दिसली. एका दैनिकात तो जहाल लेख लिहू लागला तेव्हा बाटीस्टा सरकारने ते वृत्तपत्रच बंद करून टाकले. जाहीर सभा घेण्यास त्याला बंदी करण्यात आली. रेडिओ अथवा टेलिव्हिजनवरही बोलण्यास त्याला बंदी होती. त्याच्याविषयीचा कुठलाही संदर्भ पोलिसी दडपणामुळे कुठल्याही वृत्तपत्रात येईनासा झाला. अहिंसक चळवळ करण्याची, जी थोडीफार आस्था फिडेलमध्ये शिल्लक होती, तीही या मुस्कटदाबीने नाहीशी झाली आणि पुन्हा

त्याच्या डोक्यात बंदुकीच्या गोळ्यांचे आवाज घुमू लागले.

अखेर निराश होऊन कास्ट्रोने क्यूबा सोडून मेक्सिकोत जाण्याचे ठरविले. त्याचा भाऊ राऊल आणि मोंकाडा खटल्यातले आणखी इतर काही तरुण मेक्सिकोत अगोदरच गेलेही होते.

अखेर निराश मनाने पण निराळे मार्ग अवलंबिण्याच्या जिद्दीने तुरुंगातून सुटल्या-नंतर अवघ्या दोन महिन्याच्या आत कास्ट्रोने क्यूबा सोडून मेक्सिकोस प्रयाण केले.

पण क्यूबा सोडताना देशात खूप प्रसार असलेल्या एका बोहेमियन मासिकात एक जहाल लेख येण्याची व्यवस्था त्याने करून ठेवली होती. कास्ट्रोने लिहिले होते--

"आम्ही परत येऊ ! स्वातंत्र्य आणि समता यांची ज्योत जेव्हा आम्ही आणू शकू तेव्हाच आम्ही परतू. भ्रष्टाचार आणि भूक यांना हद्दपार करण्यासाठी नागरी शांततामय लढ्याचे सर्व दरवाजे आता लोकांना बंद झाले आहेत. आता एकच उपाय आहे. बंदूक--"

सहवीस जुलै चळवळ अशा रीतीने मेक्सिकोत गेली. जाताना कास्ट्रोच्या डोक्यात निश्चित योजना होत्या. मेक्सिकोत आपला गट जमवायचा. क्यूबन क्रांतीविषयी सहानुभूती असलेले अनेक तरुण दक्षिण व उत्तर अमेरिकेत विखुरले होते. त्यांना मेक्सिकोत एकत्र करायचे. शस्त्रास्त्रे जमवायची गनिमी युद्धाचे शिक्षण द्यायचे. नंतर खुद्द क्यूबन शहरामध्ये सहवीस जुलै संघटना बांधायची, देशात सर्वत्र संप घडवून आणायचा आणि त्याच वेळी शस्त्रास्त्रानिशी बोटींमधून क्यूबाच्या किनाऱ्या-वर उतरायचे व सशस्त्र बंडाचे निशाण उभारायचे.

कास्ट्रो स्वस्थ बसणारा नव्हता. लहान मोठ्या पराभवांनी खचून जाणारा नव्हता. कृतिशील होता. एक वर्षाच्या आत त्याने क्यूबात परत येण्याचे आपले आश्वासन खरे करून दाखविले आणि तो क्यूबात परतला तो बातीस्टाला उलथून पाडायचेच या जिद्दीने !

[ क्रमशः ]

---


# अग्निपुत्र
**वसंत पोतदार**

**मूल्य : रुपये चौदा**
**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**


---

# खोखो स्पर्धा बडोदा

मुकुन्द मणूरकर

स्थळ–बडोदा. अखिल भारतीय खोखो स्पर्धेतील अंतिम सामना. प्रेक्षकांनी क्रीडांगण पूर्णपणे भरले आहे. पुण्याचे 'नवमहाराष्ट्र' व 'सन्मित्र' हे दोन संघ मैदानात उतरले आहेत. हा प्रसंग आहे बडोद्याच्या 'मध्यस्त रमत' केंद्राने भरविलेल्या निमंत्रित संघाच्या खो-खो स्पर्धेतील! खोखोचे संगोपन व संवर्धन व्हावे म्हणून ज्या काही संस्था प्रामाणिकपणे प्रयत्न करतात त्यात 'मध्यस्त'चे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. म्हणूनच त्यांचे आमंत्रण स्वीकारून भारतातील नामवंत अशा पुरुषांच्या बारा व महिलांच्या बारा संघांनी स्पर्धेत भाग घेतला होता. पुरुष विभागात खरी लढत होती ती नवमहाराष्ट्र, सन्मित्र, विजय क्लब (मुंबई), मध्यस्त रमत व जी. के. एम्. (बडोदा) यांच्यात तर महिलांच्या अजिंक्यपदासाठी मध्यस्त रमत, विजय क्लब व सरस्वती कन्या (पुणे) हे प्रयत्न करीत होते.

प्रथम साखळी व नंतर बाद पद्धतीचे सामने झाले. पुरुषांच्या उपांत्य फेरीत नवमहाराष्ट्र संघाने यजमान मध्यस्त रमतचा १३ वि. ८ गुणांनी सहज पराभव केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात मात्र सन्मित्र संघाला मुंबईच्या विजय क्लबवर मात करताना खूप कष्ट पडले. ते विजय क्लबच्या शेखर बागाईतकरने केलेल्या अप्रतिम खेळामुळे! या वेळचा बागाईतकरचा खेळ, त्याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान मिळण्यास पुरेसा ठरला. सन्मित्रने केवळ एका गुणाने निसटता विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला.

—आणि दोन तुल्यबळ संघातील झुंज सुरू झाली. गेल्या वर्षी भारतातील प्रमुख स्पर्धेत विजयी झाल्याने आत्मविश्वासाच्या बाबतीत सन्मित्रचे पारडे नक्कीच जड होते. नवमहाराष्ट्राने नाणेफेक जिंकून पाठलाग स्वीकारला व सन्मित्रचे तीन गडी

बाद केले. या वेळी त्यांचा शखर धारवाडकर तीन मिनिटे खेळला. सन्मित्रने तुफानी पाठलाग करून नवमहाराष्ट्राची पहिली तुकडी साडेतीन मिनिटात बाद केली. नवमहाराष्ट्रचे धावे दणाणले. पण त्यांचा गिरीश दंडे संघाच्या मदतीला धावून आला. त्याने साडेतीन मिनिटांचा बहारीचा खेळ करून सन्मित्रची प्रगती रोखली. सन्मित्रला चार गुणांवरच समाधान मानावे लागले. दुसऱ्या डावातही सन्मित्रचे तीनच गडी बाद झाले. त्यामुळे नवमहाराष्ट्रचे तीन गडी बाद केल्यास सन्मित्रचा विजय नक्की होता. पण सामना लढवायचाच या जिद्दीने नवमहाराष्ट्राची पहिली तुकडी आत आली. सन्मित्रने प्रथम नवमहाराष्ट्रचा संघनायक प्रकाश शेठचा पाठलाग घेतला. शेठ अतिशय आकर्षकपणे खेळत होता, घड्याळाचा काटा हळूहळू पुढे सरकत होता. एवढ्यात नवमहाराष्ट्राचे दुर्दैव आड आले. त्यांचा मधु कुलकर्णी मध्येच बाद झाला. पण इकडे शेठचा खेळ अधिकाधिक रंगत होता. तब्बल पावणेचार मिनिटे खेळल्यानंतर त्याने माघार घेतली. दोन गडी बाद झाले. बरोबरी झाली. अजून सव्वा तीन मिनिटे शिल्लक होती आणि सन्मित्रला सामना जिंकण्यासाठी केवळ एका गुणाची जरुरी होती. सन्मित्रचे खेळाडू जिवाचा आटा-पिटा करीत होते. तर प्रेक्षक श्वास रोखून बसले होते. प्रमोद गवंडे मात्र शांतपणे खेळत होता आणि वेळ संपल्याची शिट्टी वाजली. गवंडेने सव्वातीन मिनिटे नाबाद खेळून काढली. सामना बरोबरीत सुटला. दहा मिनिटांच्या विश्रांतीनंतर जादा डावास सुरुवात झाली. सन्मित्रने पहिल्या तुकडीत जरा बदल केला. तरी त्यांचे तीन गडी बाद झाले. नवमहाराष्ट्रचा प्रकाशशेठ पुन्हा एकदा अडीच मिनिटे खेळला. सामना परत बरोबरीत सुटतो की काय असे वाटू लागले. पण गेल्या दोन डावात अपयशी ठरलेल्या मधू कुलकर्णीने या डावात चार मिनिटांचा जबाबदारीचा खेळ केला व त्यामुळे नवमहाराष्ट्रने सन्मित्रवर एका गुणाने मात केली, व विजेते-पद मिळविले. या सामन्यात नवमहाराष्ट्रचा सतीश देसाई पाठलागात विशेष चमकला.

महिलांचा अंतिम सामना मध्यस्त रमत केंद्र व पुण्याचा सरस्वती कन्या संघ यांच्यात झाला. सरस्वती कन्येच्या शाळकरी मुलींनी गल्या दोन वर्षांत आपल्या-बद्दल विशेष दबदबा निर्माण केला आहे. महाराष्ट्रात तर त्यांनी मुंबईच्या महि-लांची मक्तेदारी संपुष्टात आणलीच पण राष्ट्रीय स्पर्धेतही अंतिम सामन्यापर्यंत धडक मारण्याची पात्रता संपादन केली. हा सामनाही असाच चुरशीचा झाला. पहिल्या दोन्ही डावांत दोन्ही संघांचे एक एक गडी बाद झाले. जादा डावात मध्यस्तचा एक गडी बाद झाला. सरस्वती कन्याचाही एकच गडी बाद झाला असता. पण त्यांची जयश्री देशपांडे मध्येच बाद झाली व त्यांचा पराभव झाला. अन्यथा हा करंडकही सरस्वती कन्याने संयुक्तरीत्या का होईना पण पुण्यात आणला असता. या सामन्यात मध्यस्तच्या अचला देवरे व सरस्वती कन्याच्या रेखा लुंकड,

उषा नगरकर यांनी अप्रतिम खेळ केला.

हे झाले स्पर्धेतील खेळासंबंधी. पण या स्पर्धेतील विशेष गोष्ट नमूद करायलाच पाहिजे, आणि ती म्हणजे स्पर्धेतील व्यवस्था ! कुठलीही गोष्ट करायची तर ती संस्थानिकाच्या रुबाबात नाहीतर अजिबात नाही हा बडोदेकरांचा खाक्या ! ही स्पर्धाही याला अपवाद नव्हती. इतक्या सोयी करण्यात आल्या होत्या की खेळाडूंनाही जरा चुकल्यासारखेच वाटले. 'The honoured visitors will have the most comfortable stay here, sweet and happy memories of which, they will always cherish.' अशी ग्वाही बडोदेकरांनी सुरुवातीलाच दिली होती आणि ती पुरेपूर अंमलात आणली. इतर ठिकाणच्या स्पर्धेत खेळाडूंना छळणारी मुख्य गोष्ट म्हणजे संडास-बाथरूम्सची (अ)व्यवस्था. पण बडोद्यात मात्र या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरविले होते. दुसरी गोष्ट म्हणजे सामन्यांच्या दिवसात बडोद्याचे तपमान ११४ ते ११६ डि. फॅ. होते. त्यामुळे सकाळी सामने होत नसत. दिवसभर खेळाडूंसाठी थंडगार पाणी व बर्फाची खास सोय केली होती. संध्याकाळी साडेसहा ते अकरापर्यंत सामने होत. रात्री अकरानंतर खेळाडूंना शहरात जेवण मिळणे अशक्य होते. म्हणून संयोजकांनी खेळाडूंच्या संध्याकाळच्या जेवणाची सोय मोफत केली होती. एक दिवस तर बूफे पार्टीही आयोजित केली होती. आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे सामन्यांचे गुणलेखन करणाऱ्यांना बसण्यासाठी टेबल खुर्ची न देता भारतीय बैठक दिली होती. त्यामुळे प्रेक्षकांना सामना पाहाण्यास अडचण झाली नाही. स्पर्धेच्या समारोपानंतर सर्व खेळाडूंना निरोप देण्यासाठी मध्यस्त रमतचे अनेक पदाधिकारी स्टेशनवर पहाटे तीन वाजता हजर होते.

हे एवढे विस्ताराने लिहिले याचे कारण म्हणजे इतर ठिकाणच्या स्पर्धेत खेळाडूंबद्दल बाळगली जाणारी अनास्था ! खो खो खेळणारे बहुसंख्य हे मध्यमवर्गीय असतात. कुठल्याही स्पर्धेत भाग घेताना प्रत्येकाला कमीत कमी पन्नास रुपये खर्च येतो. अगदी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या खेळाडूंनाही शंभर शंभर रुपये भरावे लागतात. इतके करूनही खेळाडूंच्या सोईकडे लक्ष दिले जात नाही. स्पर्धा आयोजित करण्यास खर्च खूप येतो हे मान्य. पण भारतात विशेषतः मुंबईत खेळासाठी देणग्या देणाऱ्या दानशूर व्यक्तींची वाण नाही. वाण आहे ती त्या दृष्टीने प्रामाणिकपणे काम करणाऱ्या खोखो असोसिएशनच्या कार्यकर्त्यांची ! सध्यातरी राजकारण खेळण्यातच ते गुंतलेले दिसतात. या स्पर्धेचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांनी पुढे कार्य केल्यास खेळाडूत उत्साह निर्माण होईल. अन्यथा आटयापाटयाप्रमाणे खो खो सुद्धा अस्तास जाण्याची शक्यता आहे. (या वर्षी राष्ट्रीय अजिंक्यपदाच्या वार्षिक स्पर्धा दिल्लीत होणार होत्या. पण पाकिस्तानच्या आक्रमणामुळे त्या पुढे ढकलल्या. या गोष्टीला सहा महिने होत.

आले तरी संघटकांतर्फे अजून कुठलीही हालचाल होत नाही आहे.)

असो. खेळाडूंच्या व प्रेक्षकांच्या दृष्टीने मात्र ही स्पर्धा चिरस्मरणीय ठरली. बडोदेकरांच्या आदरातिथ्याच्या आठवणीचा सुगंध खेळाडूंच्या दीर्घकाळ स्मरणात राहील तर बडोदेकरांच्या लक्षात राहील ती प्रकाशशेठ, बागाईतकर यांची मंत्रमुग्ध करणारी शैलीदार पळती व सतीश देसाईचे चित्त्याच्या चपळाईने सूर मारून गडी बाद करण्याचे कसब ! ◘

# ओळख

## छत्रपती पुरस्कार विजेत्या शाम पुरोहितची !

धो धो पाऊस कोसळत असतानाची संध्याकाळ सोडून वर्षातील इतर कोणत्याही दिवशी संध्याकाळी सात-साडेसातच्या सुमारास तुम्ही एस्. पी. च्या मैदानावर जा. आसमंत तुडुंब अंधाराने भरलेला असेल. तरी तुम्ही तसेच कॉलेजच्या जिमखान्याच्या दिशेने जा. जिमखान्याच्या मागच्या बाजूला एका उंच खांबावर लटकावलेल्या दोन टयूबलाईट्सच्या प्रकाशात काही मुले खो खो खेळताना दिसतील व क्रीडांगणामध्ये एक व्यक्ती उभी राहून पंचाचे व मार्गदर्शकाचे काम करताना दिसेल. तुम्ही तिला ' अहो पुरोहित ! ' म्हणून बेशक हाक मारा. हमखास प्रतिसाद मिळेल. या वरून साध्या वाटणाऱ्या घटनेत शाम पुरोहितचे यश सामावलेले आहे. कारण गेल्या पंधरा वर्षांत काही अपरिहार्य कारण सोडल्यास–असा एकही दिवस नसेल की शामने खो खोचे क्रीडांगण चुकविले !–आणि या अविरत कष्टांचे चीज झाले ! यंदाच्या वर्षी महाराष्ट्र शासनाने ' छत्रपती शिवाजी ' पारितोषिक देऊन शाम पुरोहितचा गौरव केला.

यंदाच्या वर्षी पारितोषिक मिळालेल्या काही खेळाडूंच्या बाबतीत खूप वाद झाला. पण पुरोहितची निवड मात्र वादातीत ठरली. खो खो क्षेत्रातील सर्व खेळाडू व समीक्षकांनी या निर्णयाची एकमुखी प्रशंसा केली आणि ते बरोबरच आहे ! शामच्या कर्तृत्वाची ही मालिकाच पहा–चार वर्षे पुणे विद्यापीठाच्या विजयी संघाचे प्रतिनिधीत्व व एकवेळा नेतृत्व, राज्य क्रीडामहोत्सवात पुणे शहरातर्फे प्रतिनिधित्व व चारवेळा सुवर्णपदकाचा मान, राज्य अजिंक्यपदाच्या स्पर्धेत पुणे जिल्ह्याचे नेतृत्व, राष्ट्रीय अजिंक्यपदाच्या स्पर्धेत महाराष्ट्राकडून तब्बल सात वेळा निवड व भारतीय पातळीवरील स्पर्धेत विजयी ' नवमहाराष्ट्र ' संघातर्फे अगणित



## शाम पुरोहित

वेळा प्रतिनिधीत्व व 'सर्वोत्कृष्ट खेळाडू' म्हणून निवड ! अशी ही स्वकर्तृत्वाची मालीका गुंफणाऱ्या व विपुल अनुभवाची शिदोरी जवळ बाळगणाऱ्या शामला हे पारितोषिक मिळाले नसते तर तो अन्यायच ठरला असता !

'हे पारितोषिक मिळाल्यावर तुला काय वाटले ? असे मी विचारल्यावर त्याने कष्टाचे चीज झाल्याचे सांगितले. पण त्याचबरोबर गुरुवर्य शंकरराव पाटणकरांचे मार्गदर्शन, 'नवमहाराष्ट्र' संघाचे सहकार्य, कुटुंबियांच्या सद्भावना व तो जेथे काम करतो त्या 'बँक ऑफ इंडिया'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या सवलती व प्रोत्साहन यांचा त्याने कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

शामबरोबर खेळण्याची संधी मला मिळाली आहे. त्याच्या उपस्थितीने विरुद्ध संघाचे निम्मे नीतिधैर्य सामन्याच्या सुरुवातीसच संपुष्टात आल्याचे अनुभवले आहे. शाम पुरोहितने खेळण्यास सुरुवात केली म्हणजे खोखोच्या सात मिनिटांच्या डावातील तीन-चार मिनिटांची नक्कीच शाश्वती समजावी ! त्याच्या खेळाचे एक वैशिष्ट्य आहे. पाठलाग करणारा खेळाडू झंझावाती वेगाने येवो अथवा कमी वेगाने येवो, त्याच्या हातापासून शाम केवळ काही इंचच अंतरावरून पळत असतो. त्यामुळे पाठलाग करणाऱ्या खेळाडूस वाटते, आपल्या तावडीतून शाम थोडक्यात निसटला. पहिल्या मिनिटभरात जवळजवळ सर्व पाठलागपटूंना हा अनुभव येतो. एक वेगळेच 'टेन्शन' निर्माण होते व विरुद्ध संघाच्या एकूण पाठलागावर परिणाम होऊन तो मंद होतो. मग ही स्वारी पुढची दोन-तीन मिनिटे आरामात खेळते आणि जरी यदाकदाचित विरुद्ध संघाच्या पाठलागावर परिणाम झाला नाही तरी शामचे कौशल्य त्याच्या मदतीला येते. एकूण काय तर तीन-एक मिनिटाची निश्चिती ! पण शामचे खरे कौशल्य दिसून येते ते परिस्थिती विरुद्ध जात अस-

ताना! आपले सहकारी झटकन बाद झाले तरी हा शांतपणे, दडपून न जाता खेळत असतो. चार-पाच वर्षांपूर्वीचा प्रसंग सांगतो. राष्ट्रीय अजिंक्यपदाच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राची गाठ विजेत्या गुजरात संघाबरोबर पडली होती. त्या वेळी शामच्या खेळाचा दबदबा गुजरातच्या खेळाडूंपर्यंत पोहोचला होता. त्या खेळाडूंनी महाराष्ट्राच्या तंबूत येऊन आव्हान दिले की पुरोहितसकट महाराष्ट्राची पहिली तुकडी एका मिनिटात बाद करू आणि खरोखरच त्यांनी पहिल्या तुकडीतील शामच्या दोघा सहकाऱ्यांना बादही केले. पण शाम जरासुद्धा विचलीत झाला नाही. आपले सर्व कौशल्यपणाला लावून तो शांतपणे खेळला. थोडाथोडका नाही तर तब्बल साडेतीन मिनिटे! महाराष्ट्राने हा सामना जिंकून विजेतेपद मिळविलेच, पण सामन्यानंतर गुजराती खेळाडू शामपुढे नतमस्तक झाले. प्रांजळपणे त्यांनी आपला पराभव कबूल केला. शामच्या कारकीर्दीतील हा सुवर्णक्षण होता!

शंकरराव पाटणकरांनी १९६० साली 'नवमहाराष्ट्र' संघाची स्थापना केली. तेव्हापासून अनेकवेळा 'नवमहाराष्ट्रा'च्या वारुवर आरुढ होऊन भारतवर्षात जेथे जेथे खो खो खेळला जातो तेथे तेथे दौरा करून शाम स्वत: गाजलाच पण संघालाही गाजवले! खो खो क्षेत्रातील सर्व मानमरातब व प्रतिष्ठा त्याला पुरेपूर मिळाली आहे. सतत पंधरा वर्षे खेळल्यानंतर आता प्रत्यक्ष खेळातून तो जवळजवळ निवृत्त झाला आहे. पण त्याला अजून पुष्कळ कार्य करावयाचे आहे. खो खो खेळून त्याचा स्वत:चा विकास झाला व आता खोखोच्या विकासासाठी त्याने कंबर कसली आहे! नवीन नियम करण्यासाठी व पूर्वीच्या नियमात सुधारणा घडवून आणण्यासंबंधी त्याच्याकडे निश्चित स्वरूपाच्या योजना आहेत. अभ्यास चालू आहे. याचबरोबर आपल्या दीर्घ अनुभवाचा लाभ इतर खेळाडूंना देण्यासाठी धडपड चालविली आहे. बडोद्यात नुकत्याच झालेल्या खो खो स्पर्धेत विजयी झालेल्या 'नवमहाराष्ट्र' संघाची पुरोहितने कसून तयारी करून घेतली होती.

असा हा शाम पुरोहित 'नवमहाराष्ट्र' संघाचा हिरा आहे. चौफेर तेजाने स्वत: तर चमकलाच पण सहकाऱ्यांनाही यशोमंदिराचा मार्ग दाखविला; यापुढेही दाखविणार आहे. 'छत्रपती' पुरस्कार ही त्याला क्रीडानैपुण्यबद्दल मिळालेली पावती, त्याचबरोबर त्याच्या भावी वाटचालीची सुरुवात!

## मध्यंतर

# घार हिंडते आकाशी

## नवा एकपात्री प्रयोग

गेल्या दहाबारा वर्षांत मराठी रंगभूमीवर विविध प्रकारचे एकपात्री प्रयोग सादर झाले आहेत. किंबहुना केवळ सोय म्हणूनच आपण या विविध प्रयोगांना एकाच नावाने संबोधित असतो. नाहीतर श्री. पु. ल. देशपांडे यांचे 'बटाटयाची चाळ' 'असा मी असा मी,' 'हसवण्याचा माझा धंदा' सौ. सुहासिनी मुळगावकरांचे 'संगीत सौभद्र' 'संगीत मानापमान'; सौ. गोखले यांची 'शारदा'; सौ. सुनीता देशपांडे यांचे 'राजमाता जिजाबाई'; श्री. राजुरकरांचे 'नमुनेदार माणसे'; श्री. रंगनाथ कुलकर्णी यांची 'एका गाढवाची कहाणी' 'सुदाम्याचे पोहे', सौ. कुसुम कुलकर्णी यांचा 'स्मृतिचित्रे'चा प्रयोग इत्यादी, स्वभावतः एका गटात मोडणारे नाहीत. हे सर्व प्रयोग एका नटाकरवी वा नटीकरवी सादर होतात हेच त्यातील साधर्म्य. वरीलपैकी काही प्रयोग साभिनय कथाकथनाचे, तर काही विविध भूमिका एकानेच सादर करून केलेल्या नाटकाचे, तर काही केवळ वाचनाचे (हसविण्याचा माझा धंदा) असे आहेत. गेली दहाबारा वर्षे हे विविध एकपात्री प्रयोग पाहिल्यानंतर विविध प्रश्न निर्माण होत राहिले आहेत. सौ. धर्माधिकारींच्या एकपात्री प्रयोगाचे समीक्षण करण्यापूर्वी हे माझ्या मनातले प्रश्नच मी प्रगट करीत आहे. कदाचित या निमित्ताने व्यक्त केलेल्या या प्रश्नांना कुणीतरी सार्थ उत्तर देऊ शकेल.

एकपात्री प्रयोग ही कल्पना नवी नाही असे आपल्याला श्री. पु. ल. देशपांडे 'बटाटयाची चाळ' या प्रयोगापूर्वी सांगतात ते खरेच आहे. बहुरुपी वा वासुदेवाचे स्मरण आहेच; वेगळ्या पद्धतीने आख्यान रंगविणारा कीर्तनकारही तेच करीत असे. ग्रीक रंगभूमीचे आद्यस्वरूप पाहता दुसरा नट काही वर्षांनी आलेला दिसतो. आणि तरीही आज एका बाजूला रंगभूमीचे संपन्न-समृद्ध स्वरूप उभे असता नटाला पुन्हा एकदा काळ्या पडद्यासमोर उभे राहून निव्वळ आपल्या उच्चार अभि-

नयाच्या आधारे ‘ नाटक ’ सादर करावे, असे का वाटते ? या प्रयोगामागे नेमक्या प्रेरणा कोणत्या असाव्यात ? अनेकपात्री प्रयोगातून जे व्यक्त होऊ शकत नाही असे नेमके काय एकपात्री प्रयोगातून व्यक्त होत असते; वा होऊ शकेल ? ज्या लेखक-नटांनी स्वत: लेखन करून ते नाटचरूपाने सादर केले, त्याच्यातील संपूर्ण आविष्काराची कल्पना समजू शकते. परंतु संपूर्ण सांकेतिक नाटकाचा एकपात्री प्रयोग करून दाखवावा यामागे नेमके प्रयोजन काय असावे ? अनेकदा प्रेक्षकवर्ग केवळ चमत्कार या नात्याने त्याकडे पाहतो काय ? आणि नटही स्वसामर्थ्याची कसोटी म्हणून अशा प्रयोगासाठी उभा राहतो काय ? एकपात्री प्रयोगाचे नेमके प्रयोजन काय असावे, याचा विचार करताना असे वाटते की, स्वत:च्या व्यक्तिमत्वाला अनुकूल असा आविष्कार विशेष शोधण्याचा हा प्रयत्न असावा. विशेषत: श्री. पु. ल. देशपांडे यांचे एकपात्री प्रयोग पाहताना हे जाणवते की आपल्या अंगच्या सर्व गुणांचा त्यांनी प्रयोगाला आकार देण्यासाठी उपयोग केला आहे. परंतु त्यांच्या एकपात्री प्रयोगाच्या यशामुळे अनेकजण स्वत:च्या कलात्मक व्यक्तिमत्त्वाचा विचार न करता ‘ पु. लं.’च्या पद्धतीचा नकलांना प्राधान्य देणारा, कार्यक्रम हाती घेऊन स्वत:च्या मर्यादाच अधोरेखित करीत आहेत. एकपात्री कार्यक्रम मनोरंजक व्हायचा असेल तर त्यात नकला वा संगीत आवश्यक आहेच असे नाही. किंबहुना एकपात्री कार्यक्रमात मनोगताच्या स्वरूपात संथ आशय परिणामकारकतेने नक्की व्यक्त करता येईल, परंतु हळूहळू एकपात्री कार्यक्रमाचाही एक साचा बनत चालला आहे.

सौ. सुमन धर्माधिकारींच्या एकपात्री कार्यक्रमाला जात असता गेल्या दहाबारा वर्षांतील एकपात्री कार्यक्रमाविषयी जे स्फुट प्रश्न' विचार मनात आले ते वर सहजगत्या नोंदले आहेत. ‘ घार हिंडते आकाशी ’ हे कार्यक्रमाचे नाव ऐकल्यानंतर श्री. रंगनाथ कुलकर्णी यांनी कर्तबगार स्त्रीच्या जीवनातील कार्यक्षेत्र विरुद्ध गृहकर्तव्य यांतील द्वंद्वावर आधारित निवेदन लिहिले असावे असा अंदाज केला व तो बरोबर ठरला. परंतु हा कार्यक्रम लिहित असताना श्री. कुलकर्णी यांनी सौ. धर्माधिकारींच्या व्यक्तिमत्त्वाचे पुरेसे भान राखलेले नाही असे वाटते. सौ. धर्माधिकारींच्या देहयष्टीचा डौल व नजरेतील शांत भाव हे मिश्रण या कार्यक्रमातील मूळ द्वंद्वाला पोषक होते. परंतु या कार्यक्रमाची रचना अशी आहे, अथवा प्रेक्षकांच्या सोईसाठी ती अशी केली आहे, की ज्यात नकलांचा भाग मोठया प्रमाणात येतो- या नकला (वेगवेगळया प्रांतातील लोकांच्या बोलण्याची नक्कल इ.) सादर करण्यासाठी सौ. धर्माधिकारींच्या चेहऱ्याच्या रेषा पुरेशा लवचिक नाहीत वा पुरुषी आवाजही त्या सहजपणे काढू शकत नाहीत. एका स्त्रीच्या आयुष्याच्या शोकात्मिकेचे निवेदन करताना हे सारे अनावश्यक वाटते. कु. सबनीसचा आवाज काढताना पुष्पा भोसले या नटीच्या सदोष उच्चारणाची हुबेहुब नक्कल बाईंनी केली; परंतु त्या-

मुळे साधले काय ? मिळवत्या स्त्रीच्या कुतरओढीचे चित्रण करताना नेहमी बॉसच्या तिच्याविषयीच्या 'तसल्या' अपेक्षा वा ती पुरेशी घरात नसल्यामुळे मुले पुरी बिघडणे हे यायलाच हवे का ? या संघर्षाचे स्वरूप लिखाणात इतके बटबटीत आहे की, त्यामुळे ते सादर करताना सौ. धर्माधिकारींची कुचंबणा झाली असणार. खरे म्हणजे श्री. कुलकर्णी यांनी प्रारंभी एक व्यक्तिकथा म्हणून रेखाटलेली ही कथा पुढे सपाट प्रतिनिधीक कथा होते. नोकरी करणाऱ्या स्त्रीची, विशेषत: जे प्रेम आपल्याला मिळाले नाही ते आपल्या मुलांना ओतप्रोत देण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या स्त्रीची, ही शोकात्मिका सौ. धर्माधिकारींनी आपल्या अभिनयातून, विशेषत: कार्यक्रमाच्या अंती, परिणामकारकतेने व्यक्त केली. लिखाण काही ठिकाणी भडक असूनही त्यांच्या अभिनयाच्या संयत पातळीमुळे प्रयोग सावरला. या एकपात्री कार्यक्रमाच्या उत्तरार्धातयेणारे सौ. संजीवनी मराठे यांचे पद औचित्यपूर्ण होते, आणि कोणत्याही साथीविना ते गाण्याचा सौ. धर्माधिकारी यांचा निर्णय विशेषत: औचित्यपूर्ण होता. या गाण्याच्या प्रसंगी प्रकाशगोलाच्या साहाय्याने त्या स्त्रीचे सर्वांपासून अलिप्त, खिन्न होणे श्री. अशोक साठे यांनी कौशल्याने सूचित केले.

व्यावसायिक रंगभूमीवर काम करणाऱ्या एका अभिनेत्रीने एकपात्री प्रयोग करण्याचा प्रयत्न करणे, तसे काही तिच्या मनात येणे, हेच मनाच्या ताजेपणाचे लक्षण होय. या एकपात्री प्रयोगात सौ. धर्माधिकारींना काही विशेष यश प्राप्त झाले आहे असे नाही. परंतु नाट्यविषयीची त्यांची ओढ आणि त्या क्षेत्रात असणारी त्यांची कुशलता मात्र त्यांनी या प्रयोगाच्या आधारे सिद्ध केली आहे. श्री. रंगनाथ कुलकर्णी हे स्वतः एक पात्री प्रयोग करतात; त्या प्रयोगाच्या मूलतत्त्वांचा त्यांना अधिक परिचय असेल. परंतु सौ. धर्माधिकारींसाठी लेखन करीत असताना सर्वसाधारणत: स्त्रीच्या आवाजाची फेक कोणत्या पद्धतीची असते, त्या आवाजाची लवचिकता कोणत्या दिशेने वाकवता येईल याचा; वा स्त्रीच्या अभिनयाच्या जातीचाही फारसा विचार न करता त्यांनी लेखन केले असावे.

प्रवाहाबाहेर जाऊन काही वेगळे करण्यासाठी ज्या एकपात्री कार्यक्रमांची कास धरावयाची, त्याचाही जर साचा झाला, तर एक नट काही तास स्वसामर्थ्यावर अनेकांना रिझवू शकतो या पलीकडे त्यात काहीच स्वारस्य उरणार नाही. एकपात्री कार्यक्रमातील गंभीर शक्यतांचा पुन्हा एकदा विचार करण्याची वेळ आली आहे.

—पुष्पा भावे

आमच्या बापजाद्यांच्या वेळी होता म्हणतात की एक रात्र जागा नि मासळीच्या बदल्यात खंडीभर भात घ्या, असा प्रकार होता. आता ते मासेडी गेले नि ते भातही गेलं. आम्ही कसेबसे जगतो झालं.'

'तुम्हा मुसलमान होडीवाल्यांची मच्छीमार सोसायटी आहे ?'

'छे; आम्हाला त्यातलं काहीच नाही.'

तरी पार करून उतरत्या उन्हात घाटी पकडली. बरोबर एक ब्राह्मण पॅसेंजर. बोलताना कळलं की तो ग्रामोपाध्याय आहे. गावाचा सरपंचही आहे. त्याला विचारलं,

'तुमच्या ग्रामपंचायतीचं काम कसं काय चाललंय ?'

'ऑफस!'

'का हो ?'

'खरं सांगू ? आम्ही गावाचं पुढारीपण करणारे लोक आहोत ना, ते सगळे गाववाल्यांचा विश्वास हरवून बसलो आहोत! जरा कुठे काही काम करायला घेतलं रे घेतलं की गावकरी म्हणतात 'हे ह्यांचे पैसे खाण्याचे धंदे आहेत.' आता ह्या कर्माला काय करावं ?'

'तुम्ही ब्राह्मण असूनही गावाचे सरपंच आहात ह्याचा अर्थ हाच होतो की कोकणात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची लागण झालेली नाही.'

'तसं नाही. इथेही ब्राह्मण विरुद्ध उरलेले सगळे असा प्रकार आहेच. पण देशावरल्यासारखा प्रखर नाही. मी सरपंच होण्याच्या अगोदर त्यांनी आपल्या जातभाईंना चान्स देऊन पाहिला. पण ते सगळेच खाबू निघाले, तेव्हा म्हणाले, आता भटाला हाताशी धरू या!'

'इथली प्रमुख अडचण काय आहे ?'

'कोकणाची प्रगती दोन गोष्टींमुळे अडलेली आहे. एक म्हणजे कोकणात फळबागायती नाही, आणि दुसरं म्हणजे आता ब्राह्मणवर्ग इथे रहायला जाम तयार नाही, तुम्हांला सांगतो, फळबागांच्या लागवडीशिवाय इथे तरणोपायच नाही. सरकारच्या फळबाग योजना उत्तम आहेत. फळबागांची लागवड करणाऱ्याला भरघोस मदत मिळते. पैसे मिळतात. बी-बियाणं मिळतं. पण ह्या योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी फार संथ प्रमाणात होते. मी गावकऱ्यांना परोपरीने सांगितलं की बाबांनो, तुमच्या पडीक जमिनीत काजू लावा. तर म्हणतात, की सध्या आमच्या ज्या चार काजविणी आहेत त्यातून आम्हाला कितीसे पैसे सुटतात, तर आता नव्याने झाडं लावू ? मी त्यांना सांगतो, की फळझाडं ही चार-दोन लावून प्रश्न कसा सुटेल ? ती शेकड्याने लावली पाहिजेत, तरच त्यांचे उत्पन्न पदरात पडणार. ते

ह्या कुणब्यांना पटत नाही. वाणी त्यांना फूस लावतात. कारण कुणबी अडाणी आणि गरजू रहाण्यात वाण्यांचा स्वार्थ असतो. घार्डी गुरवांना चांगले दिवस आलेले वाण्यांना परवडणार नाहीत. बरं कोकणातले शेतकरी इतके अनाडी आहेत, की ते सरकारी तगाई कर्जाचा फायदा अजिबातच उठवीत नाहीत. म्हणतात, 'तुमचं ते कर्ज पण नको नि ती फळबाग पण नको! ह्या कर्माला काय कराल?'

'ह्याचा अर्थ, कोकणी शेतकऱ्यांना नीट, सोपं आणि विश्वासार्ह शिक्षण कुणी देत नाही. त्यांचा नेमका फायदा कोणता ते त्यांना परत परत पटवून देणारा कुणीतरी हवा.'

'पण ह्या भूमीसाठी तुम्ही म्हणता तसा जीव पाखडणार कोण? स्वातंत्र्य मिळाल्याला आता वीस-पंचवीस वर्षं होतील. त्यावेळेपासून इथले लोक जर फळबागा लावायचं मनावर घेते, तर आज तुम्हाला इथे लक्ष्मीचा हात फिरलेला दिसता.'

'तुमची स्वतःची फळबाग आहे?'

'सव्वाशे कलमं आहेत.'

'त्यावरून इतर लोक धडा घेत नाहीत?'

'ज्या शेतकऱ्यांना मुंबईहून मनिऑर्डरी येतात, त्यांना फळबागांमध्ये लक्ष घालायला हळूहळू फावतंय, किंवा फावेल. उरलेले सगळे शेतमजुरीत मरणार.'

'तुमची भिक्षुकी कशी काय चालल्याय. देवा-धर्माकडे लोकांचं लक्ष आहे?'

'कसलं काय – कुणब्यांना देवधर्म नको. देवस्की हवी. ती मात्र वाढल्याय.'

अर्धा मैल घाटी तुडवल्यावर जीव कासावीस झाला. किरण मावळतीच्या सूर्याचेच होते. तरी चटके बसतच होते. एका तिठ्यापाशी झोपडं दिसलं. सुदैवाने ते चहापाण्याचं खेडवळ हॉटेल निघालं. तिथे टेकलो. चुलीवर चहाची किटली होती. एका घडवंचीवर तीन बरण्या होत्या. एकीत हळदीसारखी पिवळी धम्मक बटर बिस्कुटं होती. एकात शेंगदाण्याचे आवळ्यांएवढे लाडू होते. तिसरीत चिवड्याचा कुस्कर होता. कोनाड्यात दोन कान तुटके कप होते. ते मुसलमानांसाठी असणार. हरिजनांना चहा कसा देतात ते कळलं नाही. माझ्या अगोदरच तिथे दोन पॅसिंजर तरीवर जाण्यासाठी थांबलेले होते. मी विचारलं,

'तुमची तर केव्हा आहे?'

'चंद्रमा उगवला की सुटेल.' एका नुसतं जाकीट घातलेल्या शेतकऱ्याने उत्तर दिलं.

'चंद्रोदयाप्रमाणे तुमचं घड्याळ असतं वाटतं?'

'तसं नव्हे. पण खाडीचं ठाण चंद्रावर अवलंबून असतं. म्हणून इथले, तरीवरचे सगळे व्यवहार चंद्रमा उगवेल तसे होणार.'

'तुम्ही काय करता?'

'तरीपलीकडे जमीन आहे.'

१७ जून १९७२

'काय करता ?'

'नाचणी. शिवाय गुरांना ओला ताग. आमची जमीन वरकस आहे. पिकाऊ नाही. डबऱ्याच्या पाण्यावर व्होला घेतो. पण आता नाचणी बंद करीत आणली आहे. आता कलमं ठोकणाराय.'

'म्हणजे शेतीकडून तुम्ही फळबागायतीकडे चाललात.'

'हल्ली सगळीकडे तोच वारा आहे. जो उठतो तो चार दोन कलमं ठोकतो. इथल्या कुठल्याही वठारात जा. घाडी–गुरवदेखिल दारात दोन चार कलमं ठोकायला लागलेत. गेल्या पाच दहा वर्षांत कलमांची लागवड व्हायला लागल्याय.'

'का ?'

'कारण आंबा लवकर धरतो. चांगलं कलम पाच वर्षात मोहरतं; सातव्या वर्षी धन्याच्या पदरात फळ देतं. बरं, पहिली सात वर्षं उलटली, की काळजी नाही. माझं ऐका, आंबा हीच खरी लक्ष्मी. पूर्वी आम्ही घरच्या सुनांना लक्ष्मी म्हणायचो. पण ते खोटं, सुना मुंबईला पळतात. आंबा मात्र दारात राहतो.'

'तुमच्या लेकीबाळींना कोकण नको झालंय ?'

'ते काही विचारूच नका. प्रत्येकीला मुंबईवाला नवरा पाहिजे. नि तोही बायकोबरोबर मुंबईत राहूनच तिथेच संसार करणारा हवा. नवरा मुंबईत खानावळचा नि बायकापोरं इकडे शेतांत, असा पूर्वी जमाना होता. तो बदलला.'

'तुम्ही ग्रामपंचायतीत असता ?'

'फार्स तो ! आमचं काम काय तिथे ?'

'सगळेच असं म्हणायला लागले तर सुधारणा होणार कशी ?'

'जळ्ळे हे सुधारणा करणार !'

'आणि तुम्ही काय करता ?'

'आम्ही ताशेवाले. पूर्वी होडकूल होतं. पण एस. टी. ने होडीवाल्यांचा धंदा साफ डुबवला. आता ताशा वाजवतो.'

'वर्षभर काम मिळतं ?'

'छे. लग्नसराईत मिळतं'

'इतर वेळात काय करता ?'

'होडीवर मजूरी. खलाशी म्हणून जातो बोलावलं तर.'

'सतत बोलावणी येतात ?'

'सतत नाही; पण येतात.'

'काय मिळतं ?'

'पैसे ठरलेले नसतात. एका मच्छीमारी होडीवर तीन खलाशी आणि एक पाग टाकणारा असतो. जे मासे मिळतील ते विकून येणाऱ्या पैशाचे पाच हिस्से करायचे. तीन खलाशांना तीन. पागणाऱ्याला एक आणि होडीच्या मालकाला एक.'

'साधारणपणे किती पैसे सुटतात तुम्हाला ?'

'रुपया, दीड रुपया. तकदीर ताठ असेल तर दोन रुपये पण मिळतात. पण असं क्वचित. रुपया हाच खरा.'

"तुम्ही मशिदीत जाता?'

'जातो. मी धार्मिक आहे.'

'तुमची बायकामंडळी जातात?'

'मशिदीत नाही जात. एका मुंबईवाल्याने आपला माळा दिलाय नमाजीला. तिथे जातात.'

'आम्हा हिंदू लोकांचे जसे भटजी असतात, तसे तुमचे कोण असतात?'

'मौलवी.'

तुमच्या गावात किती मौलवी आहेत?'

'गावात कोण नाही. ते दुसरीकडून फिरत फिरत येतात.'

'म्हणजे फकीर म्हणा की.'

'फकीर वेगळे नि मौलवी वेगळे, फकीर हे फकीर. त्यांना फिकीर नसते. ते कंदील घेऊन गावोगाव भीक मागतात. मौलवी उपदेश करतात नि आम्ही वाडीवाले वर्गणी गोळाकरून त्यांना देतो.'

'किती दक्षिणा देता?'

'कधी शंभर. कधी दीडशे.'

'मौलवी काय उपदेश करतात?'

'म्हणतात, अल्लाचं नाव घ्या म्हणजे तुम्हाला बरकत येईल.'

'मौलवी साधे सरळ, सज्जन असतात?'

'हो. पण काहीकाही भामटे लोक दाढ्या वाढवून खोटेच मौलवी झाल्यायत. ते तोंडानं देवाचं नाव घेतात पण करणी खराब. दारू पितात. जुगार खेळतात. पण खरे मौलवी चांगले असतात. धीर देतात.'

'पाकिस्तानात तुमचं कुणी आहे?'

'छे.'

'आपण पाकिस्तानात जावं असं तुम्हाला कधी वाटतं?'

'छे! कशाला जाणार? कोण आहे तिथे आपलं?'

काळपट चहा आला. तो ढोसला. चहा आणणाऱ्या कळकट माणसाच्या गळ्यात जानव्याचा दोर दिसला. विचारलं,

'तुमचं नाव काय?'

'वेलणकर'

'म्हणजे मुंबईचे प्रसिद्ध हॉटेलवाले....'

'ते सांगण्यात काही अर्थ नाही. श्रीमंत ते श्रीमंत; गरीब ते गरीब. नातीगोती समानपातळीवरल्या, लोकांची असतात. आम्ही खूप सांगितलं, की ते आमचे सख्खे चुलते, तरी ते आमच्याकडे ढुंकूनसुद्धा बघायचे नाहीत. नि बघू पण नये म्हणतो

" आम्ही विजयी झालो.
आता साऱ्या जगाचा थरकाप उडू दे "

स्वातंत्र्यदिनाच्या आपल्या पहिल्याच भाषणात
विजयोन्मादाने माओ-त्से-तुंग असे म्हणत होता.

आणि खरोखरच सारे जग हादरून गेले.
शतकानुशतकांच्या सुस्तपणानंतर
अत्यंत कर्मठ अशा कम्युनिस्ट चाबकाच्या
फटकाऱ्यामुळे अक्राळ-विक्राळ शक्तीचा चीन
खडबडून जागा झाला.

या चिनी
कम्युनिस्ट क्रांतीची कथा

# आणि ड्रॅगन जागा झाला

अरूण साधू

राजहंस प्रकाशन : पुणे
मूल्य : चौदा रुपये

मी ! आमचा नकाशा आता ठरलेलाच आहे.'

'इतकं निराशेने बोलू नका हो.'

'नको कसं ? ब्राह्मण कुळातला माणूस मी. नि ह्या होडीवाल्यांना नि ताशेवाल्यांना चहा पाजून पोट जाळतोय ही विटंबना नव्हे ? पण तुम्हा मुंबईवाल्यांना ते कळायचं नाही. नि कळूही नये म्हणतो मी ! काळब दललाय. आपणही बदलावं किंवा मरावं. पण मरण हाती नाही. म्हणून बदलावं.'

'अहो, ब्राह्मणाचं फक्त ब्राह्मणासाठी काढलेलं दुकान ह्या नव्या जमान्यात कसं काय चालणार ? तेव्हा बहुजनसमाजाला धरूनच जगावं लागणार ह्यापुढे. आता ब्राह्मण्य वगैरे विसरा तुम्ही.'

'आम्ही ते केव्हाच विसरून गेलो आहोत. ब्राह्मण हवेत कुणाला ? ब्राह्मणही नकोत नि त्यांची विद्या पण नको. राजापूराला निगुडकरशास्त्री वेदशाळा चालवीत पूर्वी. आता तिथे वेद शिकायला चार टाळकी जमताहेत का ते बघून या नि मग मला सांगा. आता पैसा देणारी विद्या हवी आहे.

'काय हो वेलणकर, कोकण बदलतंय की नाही ?.'

'तुम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनीच बघा, नि न्हाळातला एक धोंडा जरी बदललेला दिसला तरी मला सांगा. इथलं वईचं एक पानही बदललेलं नाही नि बदलणारही नाही. नि मी म्हणतो, बदलूही नये ! अरे, ज्याची जमीन आपण घशात घातली त्याला उत्पन्नाचा काही हिस्सा द्यावा हे ज्यांना सुचत नाही त्यांना परमेश्वर काय उद्धरगत देणार ? हे असेच मरायचे.'

कोकणात किती नि काय बदल झाला आहे ते मी वाटचालीत निरखीत आहे. सड्यावरून पाचसहा गावकऱ्यांची टोळी हातात बॅटऱ्या घेऊन निघालेली दिसली. पूर्वी तळकोकणात बॅटरी ही चीजच नव्हती. वाळलेल्या तागाच्या काड्यांची चूड पेटवून तिच्या कापऱ्या उजेडात माणसं रात्रीची जात येत. त्याला जोक्या म्हणत. त्या पार नाहीशा झाल्या. पूर्वी श्रीमंतांकडे कंदील असायचे. तेही गेले. आता सोईस्कर आणि चष्कीबाज बॅटऱ्या आल्या आहेत. गाववाल्यांच्या अंगावरचे कपडे धड दिसत आहेत. फक्त गोठे तेवढे धाब्याचे दिसतात. बाकी बहुतेक सर्व घरांवर मंगलोरी कौलं चढलेली आहेत. ही मात्र ठळक सुधारणा दिसते आहे. गावाबाहेरच्या वळणावर बुद्धवाडा लागला. पूर्वी तिथल्या चंद्रमौळी खोपट्यामधल्या दारिद्र्याला अंत नव्हता. आता सगळी ताशीव चिऱ्यांची नि मंगलोरी कौलांची घरं तिथे झाली आहेत. पूर्वीच्या गांजलेल्या महारवाड्याने कात टाकून तो आता टुकटुकीत बुद्धवाडा झाला आहे. पूर्वी महारवाड्याच्या समोर त्यांचं पडकं देऊळ होतं. ते साफसूफ होऊन तिथे आता विहार झाला आहे, विहारात देव नाहीत. जमीन स्वच्छ सारवलेली आहे. विहाराला लागूनच विहीर आहे. तिथली एक मुलगी अॅल्युमिनियमच्या पातेल्यांतून पाणी भरून नेत होती, तिच्या पायात चांदीचे पैंजण होते. माझ्या बरोबरच्या माणसाने सांगितलं, 'खरी चंगळ ह्या महारांची

झाल्याय. ह्यांना सफाई खात्यात मस्त नोकऱ्या मिळतात. सरकारात मिळतात. ह्यांच्या घरावर मंगलोरी कौलं चढली.' हे भाष्य ऐकून मला विषण्ण वाटलं. बुद्धवाड्यातल्या अशिक्षितांना सफाई खात्यात नोकऱ्या मिळतात. ह्यांची ह्यांना पोटदुखी का? ह्या सवर्णांची मुलं सफाईखात्यात त्याच्याबदली कामं करतील? आणि खुद्द ह्यांच्या घरांवर मंगलोरी कौलं नाहीत? पण महारांच्या मागचं नष्टचर्य समुद्राच्या पाण्यासारखं मुळी संपतच नाहीसं दिसतंय. बुद्धवाड्यातली मंगलोरी कौलं काय सुखासुखी आली असतील? त्यांच्या मुंबईतल्या तरुण पोरांनी कर्ज काढून प्रतिष्ठेसाठी म्हणा किंवा दृश्य दारिद्र्यावर सूड उगवायचा म्हणून म्हणा, ही डागडूजी चालवली असणार. पण काळाबरोबर मक्तेदारीची वाळूही पायाखालून निसटत असलेल्या पांढरपेशांना हा बदल पाहावत नाही. महार हे सदाचेच अगतिक महार राहावेत असं त्यांचं स्वप्न आहे. ह्या स्वप्नांच्या धन्यांना कंटाळून हरिजनांनी धर्माची आहुती दिली. धार्मिक पुनर्जन्म घेतला. सरसकट बौद्ध झाले. हिंदू धर्म झटकून टाकला. पण नाही. कोकणात लोक धर्म बदललेल्या महारांना लोकव्यवहारात बौद्ध म्हणत नाहीत. महारच म्हणतात. महार म्हणूनच वागवतात. पूर्वी त्यांचा छळ करायचे. आता त्यांच्या चलतीचा मत्सर करतात. आज डॉ. आंबेडकर असते तर जीवाची बाजी लावून केलेल्या धर्मांतराचा व्यवहारातला हा शुद्ध निरुपयोग पाहून त्यांना पश्चाताप झाला असता? नक्की उत्तर सांगणं कठीण आहे. पण पश्चाताप होवो वा न होवो, ते परमावधीचे हताश झाले असते. असंही कळलं, कोकणी बौद्ध बदलले आहेत. ते आता सणासुदीला पूर्वीसारखी भीक मागत नाहीत. मेलेलं ढोर ओढून नेत नाहीत. मानाने स्वतःच्या विहीरीचं पाणी पितात. त्यांचे मुंबईतले लोक कर्जवाम काढून का होईना, पण बौद्धवाड्यातल्या म्हाताऱ्यांना मनी आर्डरी पाठवतात. त्यांच्या गावकरणी लेकी पायात पैंजण घालतात. बौद्धमास्तर ब्राह्मणांच्या पोरांना श्रीगणेशा शिकवतात. अंगासरशीच का होईना, हा क्रांतीचाच एक भाग आहे. धर्मांतराच्या अदृश्य अध्यात्मिक लाभाचं भारूड गेलं खड्डयात! पिढया न् पिढयांचं दारिद्र्य खणून काढण्याचा आखाडा ह्या नवजागृत मंडळींनी घातला आहे, ह्याचा कुठे तरी खोलवर मला दिलासा वाटतो आहे. विहारात म्हणे हे नवबौद्ध प्रार्थना करतात, शांतीपाठ वाचतात; ते शब्द मला ऐकू येत नाहीत पण प्रार्थना म्हणणाऱ्याच्या हृदयातला आक्रोश मला स्पष्ट ऐकू येत आहे.

तिन्हीसांजा टळल्या आहेत. मी घराच्या दिशेने घाटी चढत आहे. चंद्रबिंब पाझरत आहे जायवळासारख्या मऊमऊ चंद्रकिरणात आज मी किती युगांनी चालतो आहे? वारं भुरूभुरू वाहात आहे. सारे श्रम निवाले आहेत, शहाळ्याचं पाणी प्याल्यावर होतो तसा जीव शांत होत आहे. झाडामाडात लपलेलं माझं दिवेलागण झालेलं कोकणी चिरेबंद घर जवळ जवळ येत आहे. ◻ ◻ ◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगांवकर

MANOOS (Weekly) 50 Paise : Regd. No. MH 649

प्रकाशनाच्या
वाटेवर

# एका
# पराभवाची
# कहाणी [ झुंड ]

लेखक : ब्रिगेडियर जॉन पी. दळवी

अनुवाद : अनंत भावे